# भारत निवडणूक आयोग

२०२३-२४

# संक्षेपाक्षरांची सूची

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| AC | Assembly Constituency | DPRO | District Public Relation Officer | NGSP | National Grievance Services Portal |
| ADM | Additional District Magistrate | ECI | Election Commission of India | NOTA | None of the Above |
| ALMT | Assembly Level Master Trainer | EDC | Election Duty Certificate | NSS | National Service Scheme |
| AMF | Assured Minimum Facilities | EEM | Election Expenditure Monitoring' | NVSP | National Voter's Service Portal |
| ARO | Assistant Returning Officer | ENCORE | Enabling Communications on Real-time Environment | NYK | नेहरू युवा केंद्र |
| ATM | Automatic Trilling Machine | EP | Election Petition | PB | Postal Ballot |
| AVCO | Absentee Voters of COVID-19(category) | EPIC | Electors Photo Identity Card | PC | Parliamentary Constituency |
| AVES | Absentee Voters of Essential Services | ESC | Expenditure Sensitive Constituency | PO | Polling Officer |
| AVPD | Absentee Voters of PWD (category) | ESP | Expenditure Sensitive Pocket | PRO | Presiding Officer |
| AVSC | Absentee Voters of Senior Citizen (category) | ETPBS | Electronically Transmitted Postal Ballot System | PS | Polling Station |
| BLO | Booth Level Officer | EVM | Electronic Voting Machine | PSU | Public Sector Undertaking |
| BU | Balloting Unit | FIR | First Information Report | PWD | Person with Disabilities |
| CAPF | Central Armed Police Force | FLC | First Level Checking | RO | Returning Officer |
| CCTV | Closed Circuit Television | FST | Flying Squad Team | SDM | Sub Divisional Magistrate |
| CEO | Chief Electoral Officer | GPS | Global Positioning System | SLMT | State Level Master Trainer |
| CMS | Complaint Monitoring System | HDMI | High Definition Multimedia Interface | SLU | Symbol Loading Unit |
| CPF | Central Police Force | HF | High Frequency | SOP | Standard Operating Procedure |
| CSV | Classified Service Voter | I & B | Information & Broadcasting | SP | Superintendent of Police |
| CU | Control Unit | IMFL | Indian-made Foreign Liquor | SST | Static Surveillance Team |
| DCRC | Dispersal Center & Reception Center | IPC | Indian Penal Code | SVEEP | Systematic Voters' Education and Electoral Participation |
| DEMC | District Expenditure Monitoring Committee | IT | Information Technology | T & A | Training & Awareness |
| DEMP | District Election Management Plan' | MCC | Model Code of Conduct | U/S | Under Section |
| DFMD | Door Frame Metal Detector | MCMC | Media certification & Monitoring committee | VHF | Very High Frequency |
| DIO | District Information Officer | MLA | Member of Legislative Assembly | VM | Vulnerability Mapping |
| DLMT | District Level Master Trainer | MP | Member of Parliament | VST | Video Surveillance Team |
| DM | District Magistrate | NCC | राष्ट्रीय छात्र सेना | VVPAT | Voter-verified Paper Audit trail |

## विषय तक्ता

१. सर्वसाधारण

२. मतदान केंद्रे

३. मतदार याद्या

४. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी

५. मनुष्यबळाचे व्यवस्थापन

६. निवडणूक साहित्याचे व्यवस्थापन

७. प्रशिक्षण व्यवस्थापन

८. वाहतूक व्यवस्था

९. घोषणेपासून ७२ तासांसाठी प्रमाणित कार्यचालन पद्धती (एसओपी)

१०. नामनिर्देशन

११. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी मतपत्रिका

१२. टपाली मतपत्रिका

१३. मतदानासाठी सर्वसाधारण व्यवस्था

१४. कायदा व सुव्यवस्था

१५. आदर्श आचार संहिता

१६. निवडणूक खर्चावर संनियंत्रण

१७. मतदानासाठी व्यवस्था

१८. तक्रार व्यवस्थापन

१९. पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग आणि प्रसारमाध्यम

२०. मतमोजणी व्यवस्था

२१. माहिती तंत्रज्ञान उपयोजके

२२. मतमोजणीनंतर

# काय करावे

## आणि

# काय करू नये

# जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यासाठी

आवृत्ती १, जुलै २०२३

# सर्वसाधारण

## ✓ १.१ काय करावे

१. सर्व अद्ययावत अनुदेश, नियमपुस्तक, मार्गदर्शक सूचना आणि निदेशपुस्तके इ. तपासावे आणि सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना ते उपलब्ध करून द्या.

२. आयोगाने विहित केल्यानुसार १६ कक्ष/पथके तयार करावी आणि विहित प्रमाणे त्यांना निवडणूक जाहीर होण्याअगोदर प्रशिक्षित करा.

३. मतदार याद्या, आदर्श आचारसंहिता, दरपत्रक, खर्च संनियंत्रण, मतदान केंद्रे, ईव्हीएम/व्हीव्हीपीएटी, सुरक्षित कक्ष, मतमोजणी व्यवस्था यासंदर्भात राजकीय पक्षांच्या बरोबर बैठका घ्याव्यात.

४. वर सांगितल्याप्रमाणे घेण्यात आलेल्या सभांच्या सर्व सूचना, नोटीसा सविस्तर कार्यवृतांचा अभिलेख ठेवावा व हितसंबंधितांच्या उपस्थितीची नोंद घ्यावी आणि अशाप्रकारे ठेवलेल्या अभिलेखाचे भविष्यातील वापरण्यासाठी व पुनर्प्राप्तीसाठी निर्देशांकांसहीत सूचिपत्र तयार करा.

५. क्षेत्रांची रचना आणि क्षेत्रीय अधिकारी व क्षेत्रीय दंडाधिकारी यांच्या नियुक्तीची खात्री करा.

६. नागरिक आणि पोलिसांमध्ये समन्वय साधला जाईल याची खात्री करा.

७. क्षेत्रीय दंडाधिकारी, भरारी पथक/स्थिर संनिरिक्षण गट यांना दंडाधिकाऱ्यांसारखे अधिकार मिळावेत यासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठवा.

८. पहिल्या टप्प्यावरील तपासणी/नियुक्त्या/वितरण केंद्र आणि संकलन केंद्रासाठी योजना आखून, पोलीस अधिकाऱ्यांसह संयुक्त तपासणी केल्यानंतर सुरक्षित कक्ष (स्ट्राँग रूम)/मतमोजणी केंद्रासाठीचे प्रस्ताव मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे पाठवा.

९. जिल्हा आणि मूळ जिल्ह्यातील निवडणूक संबंधित अधिकाऱ्यांची तीन वर्षांची मर्यादा लक्षात घेऊन आदर्श आचार संहिता पथके आणि इतर पथके तयार करा.

१०. मागील निवडणुकीच्या आधारसामग्रीचे विश्लेषण करा आणि रस्ते, दळणवळणाच्या पायाभूत सुविधा इत्यादींच्या विकासाची सद्यस्थिती लक्षात घेऊन जिल्हा निवडणूक व्यवस्थापन योजना (डीइएमपी) तयार करा.

११. वेगवेगळे अहवाल संकलित करणे, तयार करणे आणि त्यांचा वेळेत प्रसार (प्रसिद्धी) करणे यासाठीचे कक्ष मजबूत करा.

१२. भारतीय निवडणूक आयोग/मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या नियोजक व दिनदर्शिकेच्या अनुरुप निवडणूक नियोजक व दिनदर्शिका तयार करा.

१३. निवडणूक वर्षात मतदार यादी तयार करण्यासंबंधी सर्व भारतीय निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन केले जात असल्याची खात्री करा.

१४. जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये, संगणकीय यंत्रणा (हार्डवेअर/सॉफ्टवेअर) आणि इंटरनेट जोडणी कनेक्टीव्हीटी इत्यादीसारख्या पुरेशा पायाभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करा.

१५. जिल्ह्यासाठी जोखीम व्यवस्थापन योजना व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करा.

## ✕ १.२ काय करू नये

१. जुन्या अभ्यास साहित्यावर अवलंबून राहू नका.

२. अनेक विधानसभा मतदारसंघाच्या अतिशय जवळ किंवा बंदिस्त ठिकाणी व्यवस्था करून वितरण केंद्र/संकलन केंद्र अडचणीची/गोंधळाची बनवू नका.

३. विविध हितसंबंधीतांना वारंवार भेटण्याचे आणि कार्यवाहीची तपशिलवार नोंद ठेवायला विसरू नका.

# मतदान केंद्रे

## ✓ २.१ काय करावे

१. शेवटच्या क्षणी होणारे बदल टाळण्यासाठी सर्व मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पडताळणी वेळेत झाल्याची खात्री करा.

२. राजकीय पक्षांशी सल्ला मसलत करून मतदान केंद्र इमारतींचे स्थान बदलण्यासाठी/मतदान केंद्रांचे पुनर्व्यवस्था/सुसूत्रीकरण, तसेच जास्तीची मतदान केंद्रे स्थापन करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवा.

३. भारत निवडणूक आयोगाच्या अनुदेशांनुसार राजकीय पक्षांना मतदान केंद्रांची मान्यता प्राप्त अंतिम सूची उपलब्ध करून द्या.

४. मतदान केंद्रे पायऱ्यांशिवायची चढणी/उतरणी जागा (रॅम्प) आणि आश्वासित किमान सुविधांनी सज्ज असल्याची खात्री करावी.

५. लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम २५ मधील तरतुदींनुसार भारतीय निवडणूक आयोगाने मंजूर केलेल्या मर्यादित मतदारसंघांसाठीच्या केंद्रांची नवीन सूची प्रकाशित करा.

६. जेथे मतदारांची संख्या १५०० मतदारांपेक्षा जास्त असेल तेथे अपरिहार्य परिस्थिती वगळता जास्तीच्या मतदान केंद्राची स्थापना करा.

७. अंतिमतः अधिसूचित मतदान केंद्रे, मतदान केंद्राच्या इमारतींचे स्थान बदलणे आणि त्यांचे नाव इत्यादींना सर्व संभाव्य माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धीची खात्री करावी.

८. मतदान केंद्रांची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर जर विद्यमान मतदान केंद्राची इमारत खराब झाल्यास, इतर कोणत्याही कारणामुळे किंवा कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे मतदानासाठी इमारत उपलब्ध न झाल्यास, मतदान केंद्रांच्या यादीतील सुधारणा/बदल पुढे पाठवा.

९. निवडणूक लढवणारे उमेदवार, राजकीय पक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातील विविध कक्ष, पोलीस, निरीक्षक, मुख्य निवडणूक अधिकारी, कक्ष (सेल) राखीव ठेवण्यासाठी इत्यादींसाठी मतदान केंद्राच्या यादीच्या पुरेश्या प्रती छापण्याची खात्री करावी.

१०. मतदानासाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी व्यवस्था करावी- मतदानासाठी आवश्यक फर्निचर आणि पायाभूत सुविधा.

क. मतदान केंद्रांचे दूरध्वनी क्रमांक किंवा जवळचा दूरध्वनी क्रमांक यांची यादी तयार करावी. (संपर्क नियोजन)

ख. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १६०/१६६ च्या अनुसार आवश्यक असल्यास, इमारतीची मागणी करावी.

## ✗ २.२ काय करू नये

१. राजकीय पक्षांशी सल्लामसलत केल्याशिवाय मतदान केंद्रांचे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवू नये.

२. आयोगाने मंजूर केलेल्या मतदान केंद्र क्रमांक/नावानुसार मतदान केंद्राचे नवीन चिन्ह प्रदर्शित करण्यास विसरू नये.

३. मुख्य आणि जास्तीच्या मतदान केंद्रामधील मतदारांची विभागणी जाहीर/प्रसिद्ध करण्यास विसरू नये.

४. मतदान केंद्राच्या २०० मीटरच्या परिसरात कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयास परवानगी देऊ नये.

५. एका पेक्षा जास्त मतदान केंद्र असणाऱ्या परिसरात मतदार सहायता केंद्राची व्यवस्था करण्यास विसरू नये.

६. मतदान केंद्र म्हणून भारतीय निवडणूक आयोगाद्वारे अधिसूचित न केलेल्या इतर कोणत्याही इमारतीत/खोलीत मतदान घेऊ नये.

क. पोलीस स्टेशन, हॉस्पिटल, मंदिरे आणि धार्मिक महत्त्व असलेल्या ठिकाणी मतदान केंद्रांची स्थापना करू नये.

ख. खाजगी इमारतींचा मतदान केंद्र म्हणून शक्यतो वापर टाळा.

# मतदार याद्या

## ✓ ३.१ काय करावे

१. निवडणूक घेण्यासाठी, मतदार नोंदणी अधिकाऱ्याद्वारे दावे आणि आक्षेपांच्या वेळेवर निपटाऱ्यासह आणि दावे आणि हरकतींची चाचणी तपासण्या यांसह, मतदार यादी तयार करण्यासाठी आयोगाने अधिसूचित केलेल्या वेळापत्रकाचे पालन सुनिश्चित करावे.

२. खालीलप्रमाणे मतदार याद्यांच्या कार्यात्मिक प्रती तयार केल्या जातील हे सुनिश्चित करणे, यादीच्या कार्यात्मक प्रती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे तयार केल्या जातील-मतदान पथके निघेपर्यंत मतदार याद्या तयार होतील याची सुनिश्चिती करा. मतदार याद्यांच्या प्रती खालील व्यक्तींना देण्यासाठी पुरेशा संख्येने तयार करण्याची खात्री करावी :

क. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार-प्रत्येकी एक.

ख. मतदान पथक-मोहोरबंद पाकिटातील चिन्हांकित प्रतीसह प्रत्येक पथकाला चार संच.

ग. क्षेत्रीय अधिकारी/मतदान केंद्रस्तरीय अधिकारी.

घ. जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या सुरक्षित अभिरक्षेत.

ङ. राखीव.

च. लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला नामांकनास (मतदार याद्यांचे चार प्रमाणित संच).

३. खालीलप्रमाणे मतदार याद्या आणि मतदार माहिती चिठ्यांच्या प्रती तयार होतील याची सुनिश्चिती करा.

क. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना, नामांकन मागे घेण्याच्या तारखेनंतर तीन दिवसांच्या आत, सतत अद्ययावत होणाऱ्या पुरवण्यांच्या यादी प्रकाशनानंतर यादीचे पुनर्मुद्रण झाल्यास, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना एक संपूर्ण संच पुरविला जावा.

ख. विशेषतः जेथे एकाच ठिकाणी अनेक मतदान केंद्रे आहेत, तेथे मतदार सहायता केंद्रावर वापरण्यासाठी वर्णक्रमानुसार स्वतंत्र आणि भाग निहाय मतदार यादी, शक्यतो इंग्रजीमधील ठेवण्यात यावी.

ग. कुटुंबासह आणि कौटुंबिक संबंध नसलेल्या, अनुपस्थित मतदारांची मतदान केंद्रनिहाय यादी अतिसंवेदनशील मतदान केंद्राच्या ओळखीसाठी देखील याचा वापर केला जाईल.

घ. अनुपस्थित/स्थलांतरित/मृत/बदली (वर्गीकृत सेवा मतदार) मतदारांची यादी तयार करून मतदान पथकांना दिली जाईल.

ङ. मतदारांची माहिती असलेल्या चिठ्ठ्या, जेथे उपलब्ध असतील तेथे, मतदानाच्या दिवसापूर्वी-किमान एक आठवडा किंवा भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, वितरित केल्या जातील.

४. अंतिम (कटऑफ) तारीख लक्षात घेऊन रोल प्रिंटिंगची व्यवस्था करावी. नामांकनाच्या शेवटच्या तारखेपर्यंत मतदार याद्या अद्ययावत केल्या जातील.

५. मतदानापूर्वी मतदारांना मतदार छायाचित्र ओळखपत्रांचे वेळेत वितरण झाल्याची सुनिश्चिती करावी.

६. निवडणूक आधारसामग्री सुरक्षित करण्यासाठी सर्व उपाययोजना कराव्यात आणि कोणतेही अनैसर्गिक समावेशन/वगळणी टाळावी.

क. राजकीय पक्षांची बैठक बोलवावी आणि मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण आणि मतदार यादी तयार/प्रसिद्ध करण्याचे वेळापत्रक स्पष्ट करावे.

ख. मतदार यादीची योग्य अयोग्यता तपासण्यासाठी नमुना १ ते ८ तयार करावा आणि वेळापत्रकानुसार मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात जमा होईल याची खात्री करावी.

ग. प्राप्त झालेले सर्व दावे आणि हरकतींची यादी मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर टाकण्यात आली आहे आणि त्यांच्या प्रती राजकीय पक्षांना पुरवल्या गेल्या आहेत याची खात्री करावी.

अ. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सत्यापित नोंदीसाठी अति सूक्ष्म तपासणीची व्यवस्था करावी.

आ. मतदार आधारसामग्री मधील दिव्यांग व्यक्ती/अति महत्त्वाच्या मतदारांना चिन्हांकित केले आहे किंवा नाही ते तपासा.

७. भविष्यातील संदर्भ आणि पुनःप्राप्तीसाठी, राजकीय पक्षांसोबत झालेल्या सभांच्या उपस्थिती नोंदवहीसह कार्यवृत्ताच्या सर्व नोंदीचे सूचीपत्र आणि निर्देशांकन करावे.

## ✗ ३.२ काय करू नये

१. वितरण न झालेल्या चिठ्ठ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे परत करायला विसरू नये.

२. आवश्यकता असलेल्या मतदान केंद्रांसाठी स्थलदर्शी वर्णानुक्रमनिहाय मतदार यादी मुद्रित करण्यास विसरू नये.

३. चिन्हांकित प्रती तयार करण्यास उशीर करू नये, अन्यथा मतदान पथकांच्या बॅगेत भरायच्या प्रक्रियेवर परिणाम होईल.

४. मतदार यादीत चिन्हांकित मतदारांची नावे (म्हणजे खासदार, आमदार आणि इतर प्रतिष्ठित व्यक्ती) आहेत का हे तपासायला विसरू नये.

५. निवडणूक आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय मतदार यादीचे अंतिम प्रकाशन होऊ देऊ नये.

६. निवडणुकीच्या वर्षात नमुना-७ ची प्रक्रिया केल्याशिवाय मृत्यू आणि स्थलांतर या कारणावरून वगळले जाणार नाही.

७. अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवस स्पष्टपणे पूर्ण झाल्याखेरीज, दावे आणि हरकतींवर कोणताही निर्णय घेऊ नये.

८. ज्याचे नाव वगळण्यासाठी प्रस्तावित आहे, अशा व्यक्तीला वैयक्तिक नोटीस दिल्याशिवाय वगळणी होऊ नये.

९. निवडणूक जाहीर झाल्यानंतर कोणतीही वगळणी, सुधारणा, स्थानांतरण करू नये.

# ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी

## ✓ ४.१ काय करावे

१. मतदानाच्या सहा महिने आधी ईव्हीएम, व्हीव्हीपीएटी आणि इतर निवडणूक साहित्याच्या आवश्यकतेचा अंदाज घ्यावा.

२. मतदानाच्या किमान पाच महिने आधी ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीसाठी आवश्यक असलेल्या उपभोग्य सामग्रीसाठी खरेदीचे आदेश द्यावे.

३. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीसाठी पुरेशी साठवण जागा उपलब्ध असल्याची खात्री करावी.

४. पहिल्या टप्प्यावरील तपासणी केंद्र, गोदाम, सुरक्षित कक्ष येथे अग्निशामक यंत्र बसवावे.

५. मोहोरबंद केल्यानंतर ईव्हीएम/व्हीव्हीपीएटी असलेल्या खोलीतील/सभागृहामधील वीज खंडित करावी.

६. इतर सर्व दरवाजे (प्रवेश/बाहेर पडण्याचा दरवाजा वगळता खिडक्या, विटांचे दगडी बांधकाम किंवा काँक्रीट वापरून बंद करावे.

७. प्रत्येक वेळी गोदाम/सुरक्षित कक्ष उघडण्याची आणि बंद करण्याचे चित्रिकरण (व्हिडिओग्राफी) केले जाईल याची सुनिश्चिती करावी.

८. प्रत्येक प्रवेशासाठी आणि बाहेर पडण्याची नोंद ठेवण्यासाठी रोजवही/रोजनिशी (ये-जा नोंदवही) ठेवावी.

९. सुरक्षा कर्मचाऱ्यांची कर्तव्य नोंदवही ठेवावी.

१०. गोदाम/सुरक्षित कक्ष/पहिल्या टप्प्यावरील तपासणी सभागृहामध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी पाठवताना किंवा प्राप्त करताना राष्ट्रीय, राज्य स्तरीय मान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या आणि उमेदवारांच्या प्रतिनिधींना आमंत्रित करावे.

११. पहिल्या टप्प्यावरील तपासणी केंद्रावर धातूशोधक द्वार चौकट (DFMD) स्थापित करावी.

१२. पहिल्या टप्प्यावरील तपासणी प्रक्रियेचे आंतरजालावरून प्रक्षेपण (वेबकास्टींग) होण्याची सुनिश्चिती करावी आणि मुख्य निवडणूक अधिकारी आणि भारतीय निवडणूक आयोग यांच्या बरोबर त्याचे ई-दुवे (लिंक्स) सामायिक करावे.

१३. राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना पहिल्या टप्प्यावरील तपासणीचे वेळापत्रक लेखी कळवावे.

१४. पहिल्या टप्प्यावरील तपासणी पूर्ण झाल्यानंतर, योग्य पोच घेऊन, राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसोबत प्रशिक्षण व जनजागृतीसाठी (टी & ए) बाहेर काढलेल्या ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची यादी सामायिक करावी.

१५. नव्याने (डी-नोवो) पहिल्या टप्प्यावरील तपासणी यादृच्छिकीकरण, उमेदवार मांडणी इ. झाल्यानंतर मतदानाच्या दिवशी राखीव म्हणून प्रशिक्षण व जनजागृतीसाठी (टी & ए) काढलेली ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी पुन्हा सादर करावे.

१६. व्हीव्हीपीएटी कागदी चिठ्यांचे तुकडे करण्यासाठी पहिल्या टप्प्यावरील तपासणी केंद्रात (तुकडे करणाऱ्या) कात्रण मशीनची (श्रेडर) तरतूद असल्याची खात्री करा.

१७. (ईव्हीएम / व्हीव्हीपीएटीची)-गोदामे / सुरक्षित कक्ष उघडणे / बंद करणे, त्यांची वाहतूक, त्यांच्या बाबतच्या जनजागृती यांचे वेळापत्रक, प्रशिक्षणाचे वेळापत्रक, पहिल्या टप्प्यावरील तपासणी, मोहोरबंद करणे, (त्यांच्या हालचालीचा) मार्गक्रम तक्ता इ. सारख्या ईव्हीएम / व्हीव्हीपीएटीच्या कार्यान्वयन चक्राच्या प्रत्येक विनिर्दिष्ट टप्प्यांच्या वेळी राजकीय पक्ष / उमेदवार यांच्याशी झालेल्या बैठका किंवा सल्लामसलत किंवा उपस्थिती यांचा अहवाल आणि नोंदी ठेवण्याची खात्री करा.

## ✓ ४.२ काय करू नये (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे खात्री करून घ्यावी)

### १. सर्वसाधारण

क. यंत्रे (युनिट्स) कोणत्याही अनधिकृत कर्मचारी/ कर्मचाऱ्यांद्वारे हाताळण्याची परवानगी देऊ नका.

ख. ईव्हीएम/व्हीव्हीपीएटी कोणत्याही अनधिकृत ठिकाणी हलवू/ठेवू/साठवू नका.

ग. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्यवस्थापन प्रणाली (EMS) मध्ये एंट्री केल्याशिवाय कोणतेही ईव्हीएम/व्हीव्हीपीएटी स्थलांतरित करू नका.

घ. चोवीस तास सुरक्षेशिवाय कोणतेही ईव्हीएम/ व्हीव्हीपीएटी सोडू नका.

ङ. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपीएटीची कोणतीही मोहोर खराब करू नका.

च. कोणतीही व्हीव्हीपीएटी चिठ्ठी जाळू नका.

छ. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी खुल्या खिडकीजवळ किंवा कोणत्याही थेट प्रकाश/तीव्र प्रकाशन येईल अशा स्त्रोताजवळ ठेवू नका.

ज. मतदानात वापरण्यासाठी आवश्यक ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी वगळता-(ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची मतदान केंद्रांवर) नेमणूक ते मतमोजणीच्या दिवसापर्यंत यंत्रे (युनिट्स) कुठेही हलवू/स्थलांतरित करू नका.

झ. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी एकटे ठेवू नका.

## २. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीच्या साठवणुकी दरम्यान

क. राष्ट्रीय आणि राज्य मान्यता प्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना सूचना दिल्याशिवाय आणि त्यांच्या सहभागाशिवाय ईव्हीएम गोदाम उघडू किंवा बंद करू नका.

ख. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी सोबत निवडणुकीशी संबंधित असो किंवा नसो (आयोगाने ठरवून दिलेली कागदपत्रे/साहित्य वगळता) इतर साहित्य ठेवू नका.

ग. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी तहसील मुख्यालयाच्या स्तराखालील कोणत्याही ठिकाणी ठेवू नका.

घ. विविध प्रकारचे ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी गोदामाच्या एकाच खोलीत / सभागृहामध्ये ठेवू नका.

ङ. इतर निवडणूक व्यवस्थापन संस्थांची (उदा. राज्य निवडणूक आयोग इ.) ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी भारत निवडणूक आयोगाच्या ईसीआय ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी एकत्र ठेवू नका.

च. शैक्षणिक संस्थांमध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची गोदाम बनवू नका.

छ. निवडणूक याचिकेशी संबंधित ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी असलेले सुरक्षित कक्ष/गोदामे संबंधित न्यायालयाच्या मंजुरीशिवाय कोणत्याही कारणासाठी उघडू नका.

## ३. वाहतूक

क. भौगोलिक स्थान निश्चिती प्रणाली/यंत्रणा (GPS)/ मोबाइल उपयोजक (ॲप)-आधारित मागोवा (ट्रैकिंग) यंत्रणा असल्याशिवाय ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची वाहतूक करू नका.

ख. कंटेनर नसलेल्या वाहनांमध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची वाहतूक करू नका.

ग. सशस्त्र सुरक्षेशिवाय ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीची वाहतूक करू नका.

घ. पेपर रोल नॉब अनलॉक स्थितीत (उभ्या स्थितीत) असल्याखेरीज व्हीव्हीपीएटीची वाहतूक करू नका.

ङ. ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीच्या फॅक्टरी ते राज्य, राज्य ते फॅक्टरी, आंतर-राज्य आणि आंतर-राज्य वाहतुकीच्या बाबतीत मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलिस अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यास विसरू नका.

च. ईव्हीएम / व्हीव्हीपीएटीच्या वाहतुकीच्या वेळापत्रकाबद्दल राष्ट्रीय/राज्यातील राजकीय पक्ष/उमेदवारांना माहिती देण्यास विसरू नका.

## ४. पहिल्या टप्प्यावरील तपासणी

क. पहिल्या टप्प्यावरील तपासणी (FLC) सभागृहामध्ये भारत निवडणूक आयोग (ECI) ने परवानगी दिलेल्या वस्तूंशिवाय कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण/उपकरणे नेण्याची परवानगी देऊ नका.

ख. यथोचित झडती घेतल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला पहिल्या टप्प्यावरील तपासणी (FLC) सभागृहामध्ये प्रवेश / बाहेर पडण्याची परवानगी देऊ नका.

ग. पहिल्या टप्प्यावरील तपासणी - (FLC) पूर्ण झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत पहिल्या टप्प्यावरील तपासणी-(FLC) मध्ये नाकारलेली युनिट्स दुरुस्तीसाठी कारखान्यात पाठवायला विसरू नका.

घ. दररोज इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व्यवस्थापन प्रणालीमध्ये (EMS) पहिल्या टप्प्यावरील तपासणीत 'ओके', पहिल्या टप्प्यावरील तपासणीत नाकारलेली, युनिट चिन्हांकित करण्यास विसरू नये.

ङ. यादृच्छिकपणे निवडलेल्या ५ टक्के ईव्हीएम व व्हीव्हीपीएटी मध्ये अभिरूप मतदान घेण्यास विसरू नये. (१ टक्का ईव्हीएम मध्ये १२०० मते, २ टक्के ईव्हीएम मध्ये १००० मते आणि २ टक्के ईव्हीएम ५०० मते)

च. पहिल्या टप्प्यावरील तपासणीत 'ओके' झालेल्या नियंत्रण युनिटवर गुलाबी कागदी मोहोर चिकटवायला विसरू नये.

छ. पहिल्या टप्प्यावरील तपासणी, प्रात्यक्षिक व प्रशिक्षण व जनजागृती दरम्यान खरी मतदान चिन्हे वापरू नये.

ज. पहिल्या टप्प्यावरील तपासणी/प्रशिक्षण व जनजागृती दरम्यान तयार झालेल्या व्हीव्हीपीएटी कागदी चिठ्ठ्या त्याच दिवशी कापून तुकडे केल्याशिवाय टाकू नये. (नष्ट करा).

झ. पहिल्या टप्प्यावरील तपासणी केंद्र, गोदाम, सुरक्षित कक्ष येथे अग्निशामक यंत्र बसवायला विसरू नये.

ञ. उप जिल्हा निवडणूक अधिकारी पदापेक्षा कमी दर्जा असलेला पहिल्या टप्प्यावरील तपासणी पर्यवेक्षक नियुक्त करू नये.

त. पहिल्या टप्प्यावरील तपासणी सुरू करण्याआधी ' पहिल्या टप्प्यावरील तपासणी सज्जता प्रमाणपत्र ' सादर करायला विसरू नये.

थ. पोलिसांकडून पहिल्या टप्प्यावरील तपासणी केंद्राचा परिसराचा रस्ता बंद करण्यास (बॅरिकेड) आणि त्या परिसराचे निर्जंतुकीकरण करण्यास विसरू नये.

द. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने जारी केलेले ओळखपत्र सादर केल्याशिवाय पहिल्या टप्प्यावरील तपासणी सभागृहात प्रवेशास परवानगी देऊ नये.

ध. पहिल्या टप्प्यावरील तपासणी कक्षात वापरात असलेल्या प्रत्येक एसएलयूसाठी (Symbol Loading Unit) एचडीएमआय इनपुट असलेला टीव्ही/मॉनिटर डिस्प्ले लावायला विसरू नये.

म. पहिल्या टप्प्यावरील तपासणी सभागृहात तपासणी प्रमाण कार्यान्वयन प्रक्रियेची प्रत प्रदर्शित करायला विसरू नये.

प. यथास्थिती, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या अधिकृत कर्मचारी आणि अभियंते वगळता कोणत्याही व्यक्तीला/अधिकाऱ्याला, पहिल्या टप्प्यावरील तपासणी पार पाडण्याची/घेण्याची परवानगी देऊ नये.

फ. पहिल्या टप्प्यावरील तपासणीत 'ओके' करण्यात, पहिल्या टप्प्यावरील तपासणीत नाकारण्यात आलेले ईव्हीएम व व्हीव्हीपीएटी एकाच सुरक्षित कक्षात ठेवू नये.

ब. पहिल्या टप्प्यावरील तपासणी पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय आणि राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना, योग्य पोच घेऊन, पहिल्या टप्प्यावरील तपासणीत 'ओके' झालेल्या युनिटांची यादी देण्याचे विसरू नये.

भ. पहिल्या टप्प्यावरील तपासणीचा दुवा (लिंक) अनधिकृत व्यक्तींना पाठवू नका.

न. पहिल्या टप्प्यावरील तपासणीचा प्रभारी आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत दररोज पहिल्या टप्प्यावरील तपासणीत 'ओके' झालेल्या युनिटांचा सुरक्षित कक्ष दुहेरी कुलुपासह बंद करायला विसरू नये.

## ५. प्रशिक्षण आणि जागरुकता

क. त्या ईव्हीएम व व्हीव्हीपीएटीला पहिल्या टप्प्यावरील तपासणीत 'प्रशिक्षण/जागरुकता' असे चिन्हांकित करायला विसरू नये.

ख. प्रशिक्षण व जनजागृतीसाठीच्या ईव्हीएमवर प्रशिक्षण/जागरुकता नमूद करणारे पिवळ्या रंगाचे स्टिकर्स चिकटवायला विसरू नये.

ग. जिल्ह्यातील एकूण मतदान केंद्रांच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त प्रशिक्षण व जनजागृती ईव्हीएम काढू नये.

घ. प्रशिक्षण व जनजागृतीसाठी पहिल्या टप्प्यावरील तपासणी 'ओके' स्टिकर्स नसलेली युनिट वापरू नये.

ङ. प्रशिक्षण आणि जनजागृती दरम्यान वास्तविक/खरे निवडणूक चिन्ह वापरू नये.

च. प्रशिक्षण व जनजागृतीसाठीची युनिटे, पहिल्या टप्प्यावरील तपासणी सुरक्षित कक्षांमध्ये किंवा पहिल्या टप्प्यावरील तपासणी 'ओके' झालेल्या युनिटांच्या सुरक्षित कक्ष परिसरात ठेवू नये, तर ती, सुरक्षेच्या अंतर्गत स्वतंत्र नियुक्त गोदामात/जवळच्या प्रशिक्षण क्षेत्रात ठेवावी.

छ. प्रशिक्षण व जाणीव जागृतीसाठीची ईव्हीएम व व्हीव्हीपीएटी ठेवण्यासाठीच्या नियुक्त गोदामांची माहिती राजकीय पक्ष/उमेदवारांना द्यायला विसरू नये.

ज. दररोज प्रशिक्षण आणि जाणीव जागृती कार्यक्रमादरम्यान तयार केलेल्या व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्या नष्ट करण्यास विसरू नये.

झ. भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे निवडणूका जाहीर झाल्यानंतर, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी मुख्यालये/महसूल उप विभागीय कार्यालये येथे आणि फिरते प्रात्यक्षिक वाहनावर स्थापन केलेली ईव्हीएम प्रात्यक्षिक केंद्र (केंद्रे) चालवू नये.

ञ. ईव्हीएम/व्हीव्हीपीएटी जाणीवजागृतीचे कार्यक्रम मोकळ्या जागेत घेऊ नये.

प. जाणीव जागृती कार्यक्रमांतर्गत १०० टक्के मतदान केंद्रांचा समावेश होईल याची खात्री करायला विसरू नये.

## ६. यादृच्छिकीकरण

क. राष्ट्रीय आणि राज्य मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना/ उमेदवारांना १ ले यादृच्छिकीकरण आणि २ रे यादृच्छिकीकरणांचे वेळापत्रक, योग्य ती पोच घेऊन, लेखी कळविण्यास विसरू नका.

ख. पहिल्या यादृच्छिकीकरणादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) आणि मतदान पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षक निशाणी (VVPAT) विधानसभा मतदारसंघानुसार असमानपणे वाटप करू नका.

ग. पहिल्या यादृच्छिकीकरणादरम्यान, नियंत्रण युनिटपेक्षा अधिक मतदान युनिटांचे वाटप करू नका.

घ. पहिल्या यादृच्छिकीकरणानंतर इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्र व्यवस्थापन प्रणालीद्वारे, विधानसभा मतदारसंघानुसार क्रमवीक्षण (स्कॅन) करून इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्र (EVM) आणि मतदान पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (VVPAT) मध्ये पावती टाकण्यास विसरू नका.

ङ. प्रत्येक मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी (विधानसभा मतदारसंघानुसार) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM) आणि मतदान पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (VVPAT) यांच्या पहिल्या यादृच्छिकीकरणाची यादीच सामायिक (शेअर) करण्यास आणि त्याची लेखी पोचपावती घेण्यास विसरू नका.

च. दुसऱ्या यादृच्छिकीकरणाची इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रे व व्हीव्हीपीएटीची यादी सामायिक (शेअर) करण्यास (लोकसभा मतदारसंघानुसार) आणि सर्व उमेदवारांना इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रे आणि व्हीव्हीपीएटींच्या पहिल्या यादृच्छिकीकरणाच्या यादीसह लेखी पोचपावतीनुसार आरक्षित युनिटची यादी सामायिक (शेअर) करण्यास विसरू नका.

## ७. कार्यान्वित करणे

क. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना इलेक्ट्रॉनिक मतदान-यंत्रे आणि मतदान पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी यंत्रे (VVPAT) कार्यान्वित करण्याबाबतचे वेळापत्रक आणि स्थळ लेखी कळविण्यास विसरू नका.

ख. तयारीची आणि कार्यान्वित करण्याच्या सर्व प्रक्रियांचे व्हिडीओ चित्रण करण्यास विसरू नका.

ग. तयारी करताना कक्षाच्या प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही नियंत्रणासह सशस्त्र पोलीस दलाची सुरक्षा २४ × ७ तास तैनात करण्यास विसरू नका.

ध. कक्षाच्या बाहेर धातूशोधक द्वारचौकट (DFMD) लावण्यास विसरू नका.

ङ. प्रत्येक प्रवेश आणि बाहेर जाणेच्या वेळी योग्य व्यवस्था केल्याची सुनिश्चिती करून घेण्यास विसरू नका.

च. मतदानयंत्राच्या भागावर (पॅनलवर) ठेवण्यापूर्वी प्रत्येक मतपत्रिकेच्या मागील बाजूवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची स्वाक्षरी घ्यायला विसरू नका.

छ. मतपत्रिका, मतदान युनिटवर चिकटवून त्याचे योग्य संरेखन प्रकारे बसली आहे ते तपासण्यास विसरू नका.

ज. ‘वरीलपैकी कोणीही नाही’ (NOTA) बटणासह सर्व उमेदवारांचे बटण अनाच्छादित (UNMASK) करण्यास विसरू नये.

झ. मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षक निशाणी (व्हीव्हीपॅट) मध्ये चिन्ह टाकताना (लोडिंग करताना), चिन्ह टाकणाऱ्या युनिटसह दर्शक युनिट (Visual display unit) बसवण्यास विसरून नका.

ञ. कार्यान्वयन केंद्र (कमिशनिंग हॉल) मध्ये अनधिकृत प्रवेश प्रतिबंधित करण्यास विसरू नये.

ट. दैनंदिन नोंदवही ठेवण्यास विसरू नका.

ठ. दररोज, मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षक निशाणी यंत्राद्वारे (व्हीव्हीपॅट) (श्रेडर) च्या कागदी चिठ्ठ्या कापून तुकडे करून नष्ट करण्यास विसरू नका.

## ८. मतमोजणी झाल्यानंतर

क. मतमोजणी झाल्यानंतर सुरक्षित कक्षामध्ये ठेवण्यापूर्वी नियंत्रण युनिट(CU)मध्ये बॅटरी ठेवू नका.

ख. मतदान आणि मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक मतदान याचिकेचा (EP) कालावधी पूर्ण होईपर्यंत, एकाच सुरक्षित कक्षामध्ये एकापेक्षा अधिक विधानसभा मतदार संघाची यंत्रे ठेवू नका.

ग. निवडणूक प्रक्रियेचा कालावधी पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच संबंधित उच्च न्यायालयाकडून निवडणूक याचिका (EP) यादी आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांचे निर्देश प्राप्त होईपर्यंत सुरक्षित कक्ष उघडू नका.

घ. मतमोजणी झाल्यानंतर सर्व व्हीव्हीपॅट गोदामात ठेवण्यापूर्वी, व्हीव्हीपॅटमधून सर्व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्या काढून टाकण्यास विसरू नका.

# मनुष्यबळाचे व्यवस्थापन

## ☑ ५.१ काय करावे

१. अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या विविध संवर्गांचा विचार करून कर्मचाऱ्यांची आवश्यकता निर्धारित करा.

२. भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या प्राधिकरणांमधून कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

३. मुख्य निवडणूक अधिकारी यांनी पुरविलेल्या केंद्र सरकार/राज्यशासन, केंद्र/राज्य शासन यांचे सार्वजनिक क्षेत्र उपक्रम, संगणक क्षेत्रातील (सॉप्टवेअर) मधील शासकीय कंपन्या या सर्व कर्मचाऱ्यांची संगणकीय आधारभूत माहिती तयार करणे.

४. खालीलप्रमाणे मतदान पथकांचा गट आणि रचना निश्चित करणे.

क. मूळ वेतन, पद आणि श्रेणी यांच्या आधारे मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी करावयाचे वर्गीकरण.

ख. मतदान केंद्राध्यक्ष, शक्यतो राजपत्रित अधिकारी आणि/किंवा पर्यवेक्षीय स्तरावर काम करण्याची क्षमता असलेले असावेत.

ग. कर्मचारी वर्गाचे उचित पद्धतीने एकत्रिकरण करावे.

घ. मतदान पथकात एक मतदान केंद्राध्यक्ष व सोबत तीन मतदान अधिकारी असावेत. विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकावेळी घेतल्यास, एक मतदान केंद्राध्यक्ष व सोबत पाच मतदान अधिकारी असावेत.

५. पुढील तीन टप्यानुसार मतदान कर्मचारी वर्गाचे यादृच्छिकीकरणची सुनिश्चिती करावी :

क. पहिल्या टप्प्यात–जिल्ह्यासाठी ४० टक्के एवढ्या राखीव मतदान कर्मचाऱ्यांची आवश्यक संख्या निश्चित करणे व निवडणे.

ख. मतदान कर्मचारीवर्गाच्या नेमणुकीचे आदेश योग्य आणि वेळेवर पाठवल्याची खात्री करणे.

ग. दुसऱ्या टप्प्यात–मतदान पथकांची आखणी करणे विधानसभा मतदार संघाची माहिती असेल परंतु प्रत्यक्ष मतदान केंद्रांची माहिती नसावी. निरीक्षकांनी उपस्थित राहिलेच पाहिजे. हे यादृच्छिकीकरण, मतदानाच्या दिवसापूर्वी ६/७ दिवस आधी करू नये.

घ. तिसरा टप्पा–मतदान पथक प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाण्यासाठी निघण्यापूर्वी २४ तास आधी, मतदान केंद्राचे वाटप केले जाईल. त्यावेळी निरीक्षकांची उपस्थिती आवश्यक असेल. मात्र अशी यादी केवळ विभागणीकरण्याच्या वेळी जाहीर करणार नाही.

६. मतदान कर्मचारी वर्गासाठी कल्याणकारी उपाय, जसे संकलन केंद्र व मतदान केंद्रावर जाण्याची व्यवस्था तसेच मतदान केंद्र याठिकाणी निवास भोजन, पिण्याचे पाणी, स्वच्छ अन्न इत्यादींची वितरण व्यवस्था झाल्याची खात्री करणे.

७. मतदान कर्मचारीवर्गाना कर्तव्याचे वाटप करताना, महिला अधिकारी आणि दिव्यांग व्यक्तिसाठींच्या विशेष तरतुदी लक्षात घेणे.

८. निरीक्षकांसमवेत सल्लामसलत करून, सूक्ष्म निरीक्षकांसाठी स्वतंत्र आधारसामग्री (माहिती) संकलन तयार केले जाईल आणि यादृच्छिकीकरण केले जाईल.

९. मतदान कर्मचारी वर्गाच्या मानधनाची रक्कम, दैनिक भत्ता, सानुग्रह अनुदान इत्यादींच्या तात्काळ प्रदानाची व्यवस्था करणे.

## ☒ ५.२ काय करू नये

१. सूट मिळालेल्या प्रवर्गाच्या अधिकारी/कर्मचारी यांची निवडणूक कर्तव्यांसाठी नेमणूक करू नये.

२. निवडणूक कर्तव्यावर कर्मचारी नेमणूक करताना, एखाद्या विशिष्ट विभाग/संस्थांवर जास्त ताण देऊ नका.

३. मतदान पथक तयार करताना, ज्येष्ठतेचा भंग करू नका.

४. एकाच विभाग/कार्यालयातील दोन अधिकारी एकत्र ठेवू नका.

५. तीन टप्प्यातील यादृच्छिकीकरण प्रक्रियेच्या आधारावर मतदान पथके तयार केल्याबाबतचे प्रमाणपत्र मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठवण्यास विसरू नका.

६. निवडणूक प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही कामात जसे की, प्रचार करणे, प्रचाराचे साहित्य वाहून नेणे इत्यादी कामात मुलांना कामाला लावू नका.

७. मतदान सुरक्षा कर्मचारी वर्ग यांना ते ज्या मूळ विधानसभा मतदार संघात काम करत आहेत, त्या विधानसभा मतदार संघात त्यांची नेमणूक करू नका.

८. सर्व कर्मचारी वर्ग, उमेदवार आणि प्रतिनिधी यांच्यासाठी विविध रंगीत सांकेतिक ओळखपत्रांची व्यवस्था करण्यास विसरू नका.

# निवडणूक साहित्याचे व्यवस्थापन

## ☑ ६.१. काय करावे

१. आवश्यक असलेल्या सर्व बाबींची विहित यादी तपासा आणि अद्ययावत करा.

२. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करावयाच्या वस्तू आणि जिल्हा स्तरावरून प्राप्त करावयाच्या वस्तूंची यादी करा. सांविधानिक आणि असांविधानिक नमुने आणि इतर लेखनसामग्रीच्या आवश्यकतेची तपासणी मतदानाच्या ८०-९० दिवसांच्या आधी करा.

३. पुन्हा वापरता येण्याजोग्य उपलब्ध वैध सामग्रीचा विचार करून विहित प्रमाणानुसार मदतगार क्षेत्रांसह (राखीव सह), मतदान केंद्रांच्या संख्येआधारे साहित्याच्या आवश्यकतेचे योग्य निर्धारण करा.

४. मतदान पथकासाठी सर्व विहित नमुने/माहितीफलक सहज वेगळे करता येण्याजोगी पुस्तिका तयार करा.

५. साहित्याचे वितरण आणि देण्याच्या सर्व स्तरावर नोंदवही ठेवण्याची व्यवस्था करा.

६. निवडणूक जाहीर होण्यापूर्वी जिल्हा स्तरावर योग्य खरेदी प्रक्रिया सुरू करा.

७. वितरण व संकलन केंद्रात तपासणी सूचीनुसार, मतदान केंद्राध्यक्षांना सर्व वस्तूंचे योग्य वितरण आणि प्राप्ती झाली असल्याची सुनिश्चिती करा.

## ☒ ६.२. काय करू नये

१. सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ लोटलेल्या पक्या शाईचा साठा वापरू नका.

२. पिशवीत असलेले साहित्य जसे की, मेणबत्या, मोहोर बंद करण्यासाठीची लाख, इत्यादी सारखे साहित्य उष्ण भागात किंवा उन्हात ठेवू नका.

३. साहित्य बदलण्यासाठी/राहिलेल्या वस्तू देण्यासाठी वितरण केंद्रावर देवाण-घेवाण काऊंटर उघडण्यास विसरू नका.

४. मतदानासाठी कालबाह्य झालेल्या उपयोग्य वस्तू वापरू नका.

# प्रशिक्षण व्यवस्थापन

## ☑ ७.१. काय करावे

१. मतदानाच्या किमान ६ महिने आधी तपशीलवार प्रशिक्षण दिनदर्शिका तयार करा.

२. जिल्हास्तरीय मुख्य प्रशिक्षक/विधानसभा स्तरीय मुख्य प्रशिक्षक, क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस, राजकीय पक्ष, प्रसार माध्यमाचे कर्मचारी, निवडणूक खर्च व्यवस्थापन संघ (ईईएम संघ) उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी, मतदान कर्मचारी, मतमोजणी कर्मचारी, विविध विभागाचे कर्मचारी, संकलन केंद्र व वितरण केंद्र (डीसीआरसी) यांचे कर्मचारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी/मतदान केंद्र स्तरीय अधिकाऱ्यांचे पर्यवेक्षक, सूक्ष्म निरीक्षक, माहिती तंत्रज्ञान विभागाचे कर्मचारी, आदर्श आचार संहितेचा संनियंत्रण चमू या सर्वांचा प्रशिक्षणात समावेश करा.

३. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे प्रमाणित प्रशिक्षण नियामक (मॉड्युल) विकसित करा आणि वापरा.

४. ५० पेक्षा अधिक नसतील अशा प्रशिक्षणार्थींची प्रत्येक तुकडीत मुख्य प्रशिक्षकांचा समावेश असेल, त्यासाठी स्थळ निश्चित करा.

५. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM)/व्हीव्हीपॅट वरील प्रत्यक्ष प्रशिक्षणाची आणि विविध सांविधानिक नमुने/नोंदवह्या/ अहवाल भरून घेण्याची व्यवस्था करणे.

६. प्रशिक्षण प्रक्रियेचे व्हीडिओ चित्रणाची व्यवस्था केल्याची सुनिश्चिती करा.

७. टपाली मतपत्रिका/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रासाठी काऊंटरची व्यवस्था करा.

८. निवडणूक कर्तव्यार्थ कर्मचाऱ्यांकडून टपाली मतपत्रिकेसाठी सुविधा केंद्राची उभारणी करणे.

९. सर्व प्रशिक्षणाच्या ठिकाणी प्रात्याक्षिक सुविधा दृक (ऑडीओ)/श्राव्य चित्रिकरणाच्या (व्हीडीओची) तरतुदीची सुनिश्चित करावी.

१०. सर्व प्रशिक्षणाच्या ठिकाणी तुमची शक्य तितक्या व्यक्तिशः उपस्थिती असल्याची सुनिश्चिती करा.

११. प्रशिक्षणाच्या ठिकाणी मतदान कर्मचाऱ्याच्या अहवाल आणि उपस्थितीसाठी योग्य सुविधा असल्याची सुनिश्चिती करा.

१२. सर्व माहिती तंत्रज्ञानातील अनुप्रयोगांबाबत योग्य प्रशिक्षणाची खात्री करा.

१३. मतदान कर्मचाऱ्यांना त्यांचे छायाचित्रे आणण्यास सांगा आणि त्याचबरोबर निवडणूक कर्मचाऱ्याच्या ओळखपत्रासाठी फोटो काढून मिळण्याकरिता प्रशिक्षणाच्या ठिकाणी एका छायाचित्रकाराची व्यवस्था करा.

## ☒ ७.२. काय करू नये

१. प्रशिक्षण स्थळांची निवड करणे–एका तुकडीमध्ये प्रशिक्षणासाठी ५० पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र ठेवू नका.

२. दिव्यांगव्यक्तिच्या गरजा संबंधात त्यांच्याशी सद्भावपूर्वक वर्तन करा आणि मतदान केंद्रावर त्यांना आवश्यक ते सहाय्य करण्यासाठी मतदान कर्मचारीवर्गामध्ये जाणीव जागृती करण्यास विसरू नका.

३. प्रशिक्षणानंतर मूल्यांकनाची व्यवस्था करण्यास विसरू नका.

४. मतदानाच्या दिवशी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) आणि व्हीव्हीपॅट बदलाची नियमानुसार प्रक्रिया केल्यास अभिरूप मतदानाची माहिती काढून टाकण्याबाबत भर देण्याबाबत विसरू नका.

५. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVMs) आणि मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षक चिन्हांच्या (व्हीव्हीपॅट) बाबतीत काय करावे आणि काय करू नये यावर माहिती देण्यास विसरू नका.

६. प्रशिक्षण सत्र चालू असताना उपस्थिती घेऊ नका.

# वाहतूक व्यवस्था

## ☑ ८.१. काय करावे

१. निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक तेवढ्या प्रत्यक्ष वाहनांची व्यवस्था करा.

२. निरीक्षक, क्षेत्र दंडाधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकारी, मतदान पथके, क्षेत्र अधिकारी, सुक्ष्म निरीक्षक, सहायक खर्च निरीक्षक, भरारी पथके, स्थिर संनिरीक्षक, छायाचित्रण सर्वेक्षण पथक (व्हीएसटी), पोलीस दल (राज्य आणि केंद्रीय), आदर्श संहिता पालनाच्या निरीक्षणासाठीचे पथक, व्हिडीओग्राफर/फोटोग्राफर, अद्ययावत कॅमेरासह आणि निवडणूक कार्याशी संबंधीत विविध विभाग तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅट यांची वाहतूक, यांच्यासाठी वाहतुकीची व्यवस्था करणे.

३. दळणवळणाच्या रस्त्याच्या जाळ्यांच्या सद्यस्थितीनुसार मार्ग अद्ययावत मार्गक्रम तक्ता तयार करणे.

४. प्रत्येक मतदान केंद्रासाठी मार्ग नकाशा तयार करा आणि त्याचा एक प्रत मतदान पथक व क्षेत्र अधिकाऱ्यांकडे द्या. मार्ग नकाशामध्ये मुख्यालयापासून शेवटच्या मतदान केंद्राचे अंतर दर्शविणे आवश्यक आहे. मतदार संघाच्या नकाशावर देखील मार्ग आरेखित करणे आवश्यक आहे.

५. गरजेनुसार खाजगी आणि शासकीय दोन्ही वाहनांच्या (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १६० नुसार) अधिग्रहणाची खात्री करा.

६. कोणत्याही बोटी, हेलिकॉप्टर किंवा अशी इतर वाहतुकीच्या साधनांची तजवीज करणे आवश्यक आहे ते तपासा आणि पाऊस किंवा अशा इतर घटनांमध्ये कोणतीही विशेष तयारी करणे/सावधगिरी घेणे आवश्यक आहे किंवा कसे हे तपासा.

७. सर्व वाहन मालकांना त्यांचे वाहनचालक/वाहक/सहायक (क्लिनर) यांच्याबद्दलची माहिती त्यांच्या नावनोंदणीच्या तपशीलांसह आगाऊ देण्यास सांगा.

८. वितरण केंद्र व संकलन केंद्रा (DCRC) मध्ये एका विधानसभा मतदार संघापेक्षा अधिक असल्यास वाहनांना विविध रंगांचे सांकेतिक माहितीफलक द्या. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) व्हीव्हीपॅट वाहून नेणारी वाहने भौगोलिक स्थाननिश्चयन प्रणाली (GPS) लावलेली आहेत याची खात्री करा.

९ निवडणूक कर्तव्यार्थ वापरत असलेल्या सर्व वाहनांवर, योग्य प्रकारे खूण चिन्ह लावलेली आहेत याची खात्री करा.

१०. कोणताही बिघाड टाळण्यासाठी सर्व अभिकरणांकडून मागविलेली वाहने, सुस्थितीत उपलब्ध करून घेतल्याची खात्री करा.

## ☒ ८.२. काय करू नये

१. संभाव्य तारखांना इंधनाच्या गरजेनुसार इंधन केंद्रांना माहिती देण्यास विसरू नका.

२. मतदान पथकांनी वाहन घेण्यापूर्वी वाहनाची स्वच्छता, दुरूस्ती व्यवस्थित करून घेण्यार विसरू नका.

३. सूट दिलेल्या विभाग/संस्थांच्या वाहनांची मागणी करू नका.

# घोषणेपासून ७२ तासांसाठी प्रमाणित कार्यचालन पद्धती (एसओपी)

## ☑ ९.१. काय करावे

१. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७(१) आणि १२७ अ आणि भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ एच च्या तरतुदींचे स्पष्टीकरण आणि निवडणूक तारखांचे वेळापत्रक जाहीर करण्यासाठी पत्रकार बैठकीचे आयोजन करून बातमी प्रसिद्ध करा.

२. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२७अ अन्वये आवश्यक केल्याप्रमाणे माहिती आणि मुद्रित साहित्य सादर करण्यासाठी, निवडणूक जाहिर केल्याच्या ३ दिवसांच्या आत सर्व मुद्रणालयांना जिल्हा दंडाधिकारी यांनी लेखी कळवावे.

३. आयोगाने निवडणुका जाहीर केल्यापासून ३ दिवसांच्या आत सर्व मान्यता प्राप्त राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांसोबत बैठका घ्याव्यात. या बैठकीमध्ये सर्व कायदेशीर तरतुदी व अनुदेश स्पष्ट करावे.

४. निवडणुका जाहीर झाल्यानंतर, निवडणूक यंत्रणेवरील खर्चाच्या संनियत्रणासाठी (भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ब आणि १७१ क) नुसार सर्वसाधारण जनतेच्या हिताकरिता मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे निवडणूक प्रक्रिये दरम्यान होणारा खर्च सादर करण्याचे आवाहन करणे.

५. परवानाधारक शस्त्रे बाळगण्यावर बंदी : फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १४४ अन्वये निवडणुकीची घोषणा होताच परवानाधारक शस्त्रे बाळगण्यावर बंदी घालण्याचे निषिद्ध आदेश दिले जातील आणि ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंत लागू असतील.

६. शस्त्र परवाना देण्यावर बंदी : अधिसूचित केल्याप्रमाणे निवडणूका जाहीर झाल्याच्या तारखेपासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत शस्त्रपरवाना देण्यास मनाई करण्यात यावी.

७. निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेचच, सर्व परवाना धारकांचा तपशीलवार आणि वैयक्तिक आढावा घ्या जेणेकरून, मुक्त आणि निष्पक्ष निवडणूक पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता अत्यावश्यक मानल्या गेलेल्या प्रकरणांमध्ये परवाना धारक शस्त्रे जप्त केली जातील. सर्व परवाना धारकांच्या पुर्नविलोकन आणि तपासणीसाठी निरीक्षण समितीमध्ये जिल्हा दंडाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांचा समावेश असेल. क्षेत्रीय आयुक्तालयात पोलीस आयुक्त आणि सह/अप्पर पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचा समावेश असेल. छाननी समितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

८. बँकांसोबत पुढील बाबींकरिता बैठक आयोजित करणे :-

(क) उमेदवारांना बँकखाते उघडणे आणि धनादेश (पुस्तिका) देणे सोयीचे होण्यासाठी.

(ख) १० लाखांपेक्षा अधिक रुपयांचे संशयास्पद व्यवहार केल्यास अहवाल पाठविण्यासाठी.

(ग) वित्त मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एटीएम (ATM) वाहनांसाठी अनुसरण्यात येणारी प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी.

९. मालमत्तेच्या विरूपणाशी संबंधित तरतुदींच्या पालनाची खात्री करणे :

(क) निवडणूक जाहीर झाल्यापासून २४ तासांच्या आत शासनाच्या मालमत्तेच्या सर्व भिंतीवरील लेखन, भित्तिचित्रे/भित्तिपत्रके किंवा इतर कोणत्याही स्वरुपाचे विद्रुपीकरण, कटआउट/जाहिराती, निशाण्या, ध्वज इत्यादी काढून टाकण्यात येतील.

(ख) भिंतीवरील लेखन/भित्तिपत्रके, अन्य कोणत्याही स्वरुपाचे विद्रुपीकरणाचे कागदपत्रके, कटआऊटस/जाहिराती या स्वरुपातील सर्व अनधिकृत राजकीय जाहिराती, काढून टाकणे.

१०. शासकीय वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध करणे, निवडणुकीदरम्यान निवडणूक प्रचार किंवा निवडणुकीशी संबंधित प्रवास (संबंधित मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या विशिष्ट अपवादांच्या अधीन राहून) कोणताही राजकीय पक्ष, उमेदवार किंवा निवडणुकीशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्तीला (निवडणूक संबंधित शासकीय संबंधित शासकीय कर्तव्य बजावणारे अधिकारी वगळता) प्रचारासाठी शासकीय वाहन वापरण्यास पूर्णपणे बंदी असेल.

११. निवडणुका जाहीर झाल्यानंतर, लगेचच शासनाची कामगिरी दर्शविणाऱ्या कामांबाबत छापील/दूरदर्शन वाहिन्यांमधील (ईलेक्ट्रॉनिक माध्यमातील) कोणत्याही जाहिराती काढून टाकण्यासाठी/थांबवण्यासाठी त्वरित कारवाई करा.

१२. केंद्र/राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित असलेले मंत्री, राजकारणी किंवा राजकीय पक्षांचे सर्व संदर्भ काढून टाकण्याची खात्री करा.

१३. निवडणुका जाहीर झाल्याच्या ७२ तासांच्या आत, आदर्श आचार संहितेचे (MCC) उल्लंघन केल्याबद्दल कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास विधिग्राह्यता पाहण्याच्या बाबतीत संदर्भासाठी खालील कामांची यादी मिळवा.

(क) जमिनीवर आधीच सुरू झालेल्या बांधकामांची यादी.

(ख) जमिनीवर सुरु न झालेल्या नव्या कामांची यादी.

१४. दारु/रोख रक्कम/निषिद्ध ड्रग्ज अंमली पदार्थ/अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी यांची उत्पादन शुल्क विभागाच्या चलचित्र निर्मिती संघ (VST) भरारी पथकाच्या मार्फत सखेल तपासणी करणे आदर्श आचार संहितेचे खर्चाचे सनियंत्रण व अंमलबजावणी यांवर भरारी पथकामार्फत तात्काळ कारवाई करण्याची सुनिश्चिती करणे, दारु/अंमली पदार्थ इ. अवैध तस्करीवर लक्ष ठेवण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकांचा वापर करणे.

१५. संपर्क केंद्राचा टोल फ्री नंबर १९५० कार्यान्वित असल्याची खात्री करा.

१६ माहिती व तंत्रज्ञानाची सर्व उपयोजके (Applications) अधिकृत संकेतस्थळासह अद्ययावत आणि घोषणेसह कार्यान्वित आहेत याची खात्री करा.

१७. मतदार आणि राजकीय पक्षांच्या जनजागृतीसाठी, माहिती प्रसिद्ध केल्याची सुनिश्चिती जिल्हा निवडणुक अधिकारी/निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या मार्फत रेडिओ, दूरचित्रवाहिनी, चित्रपट, समाजमाध्यमे इ. द्वारे मुख्य निवडणुक उपक्रमांची माहिती प्रसारणाची सुनिश्चिती करा.

१८. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी यांच्या वापरासह निवडणूक पद्धतीबाबत माध्यम केंद्रांद्वारे मतदार, राजकीय पक्ष आणि इतर हित संबंधितांमध्ये जन जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करा.

१९. प्रसार माध्यमांवर (इलेक्ट्रॉनिक मिडियावर) दिल्या जाणाऱ्या प्रस्तावित राजकीय जाहिरातींच्या पूर्व-प्रमाणीकरणाच्या घोषणेवर माध्यम प्रमाणपत्र व संनियंत्रन समितीने (MCMC) ताबडतोब काम सुरू केले आहे याची खात्री करा.

२०. पुरेशे मनुष्यबळ आणि इतर सेना स्थापन तंत्र यांच्या नेमणुकीसह जिल्हा स्तरावर तात्काळ २४ तास (रात्रंदिवस) नियंत्रण कक्ष कार्यान्वीत करा.

२१. निवडणूक जाहीर झाल्यावर, नवीन दारू परवाना देण्यावर बंदी घातल्याची खात्री करा.

२२. निवडणूक जाहीर झाल्यापासून ०३ दिवसांच्या आत असुरक्षित आणि अतिसंवेदनशीलता निर्माण करणारी (ठिकाणांची) पहिली यादी अंतिम केली असल्याची खात्री करा.

२३. राजकीय पक्षांना आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना परवानगी देण्यासाठी, निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेचच, विविध सुविधांच्या मापनासह सुविधा (SUVIDHA) कार्यान्वित असण्याची खात्री करा.

२४. विविध हित संबंधितांना विविध माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजकावरील प्रशिक्षण दिल्याची सुनिश्चिती करा.

२५. निवडणुका जाहीर झाल्यापासून तीन दिवसांच्या आत राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून, विविध खर्चाचा दर तक्ता बाबतच्या अधिसूचनेची सुनिश्चिती करा.

## ☒ ९.२. काय करू नये

१. घोषणा केल्यानंतर, लगेच पाठवण्यात येणाऱ्या विविध पत्रांचा मसुदा आगाऊ तयार करण्यास विसरू नका.

२. भविष्यातील गोंधळ टाळण्यासाठी राजकीय पक्षांना त्यांच्याशी संबंधित विविध समस्यांबद्दल माहिती देण्यास विसरू नका.

३. घोषणेनंतर ताबडतोब पुरेशी कार्यवाही करण्यासाठी संबंधित सर्व पदाधिकाऱ्यांना सूचना देण्यास विसरू नका.

४. पोलीस, उत्पादन शुल्क, बँक, आयकर, टपाल विभाग इत्यादी सारख्या विविध प्राधिकरणाबरोबर वारंवार बैठका घेण्यास विसरू नका व त्यांना त्यांच्या कर्तव्याबद्दल संक्षिप्त माहिती देण्यास विसरू नका.

# नामनिर्देशन

## ☑ १०.१. काय करावे

१. राजकीय पक्षांना नामनिर्देशन प्रक्रिया नमुना-अ, ब सादर करणे, नमुना-२६, गुन्हेगारी पूर्वेतिहास इत्यादी माहिती देणे, ज्यात नामनिर्देशने भरण्याची आणि सुरक्षा रक्कम (अनामत) जमा करण्याची ऑनलाईन सुविधा दिलेली आहे, या सर्वांची संक्षिप्त माहिती द्या.

२. निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर, निश्चित केलेल्या नामनिर्देशनाच्या जागांची तपासणी करणे आणि घड्याळ, माहितीफलक, सी. सी. टी. व्ही., व्हिडीओ कॅमेरा, जागेची क्षमता, बैठक व्यवस्था, शुल्क अनामत जमा करणे, पक्की बसवलेली वस्तू/फर्निचर इत्यादीं सारखी आवश्यक व्यवस्था करणे.

३. नामनिर्देशनाच्या समस्या/प्रक्रिया यांवर निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या गटाला प्रशिक्षण देणे.

४. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना/सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना नामनिर्देशनासाठीच्या सर्व नवीनतम सूचना देणे.

५. निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना आयोगाच्या आदेशानुसार नवीनतम चिन्हे (SYMBOL) देणे.

६. निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना अपात्र व्यक्तींची नवीनतम यादी द्या.

७. निवडणूक खर्च नोंदवह्यांची उपलब्धता आणि त्या मिळवल्याची खात्री करणे.

८. भारत निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे दिलेल्या नमुना-१ (निवडणुकीची सूचना) पूर्व-तपासणीची व्यवस्था करणे.

९. प्रत्येक नामनिर्देशन भरलेल्या उमेदवाराला, पोचपावती मिळाल्यानंतर विविध वस्तूंच्या दरपत्राच्या सूचनेची प्रत दिल्याची खात्री करा.

१०. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला दररोज विहित नमुन्यात नामनिर्देशन अहवाल पाठविल्याची खात्री करा.

११. शक्य तितक्या लवकर, नमुना २६ मधील सर्व शपथपत्रे एकत्र करा आणि त्याची प्रत कोणत्याही अर्जदाराला प्रत काढण्याच्या खर्चाचे नाममात्र शुल्कभरुन, उपलब्ध करून द्या आणि त्याचबरोबर २४ तासांच्या आत मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर नमूना-२६ अपलोड करा.

१२. नामनिर्देशने प्राप्त झाल्याच्या दिवशी एन्कोर (ENCORE) मध्ये नामनिर्देशने माहितीची नोंद झाल्याची खात्री करा.

१३. उमेदवारांना, नामनिर्देशनाच्या माहितीची ऑनलाईन नोंदणी करण्यास प्रोत्साहित करा.

१४. नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३-०० वाजेपर्यंत, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना प्राप्त होणारे नमुना-अ आणि नमुना-ब स्वीकारले गेले आहेत याची खात्री करा.

१५. नामनिर्देशनपत्रांची प्राथमिक तपासणी तांत्रिक दृष्टीकोनातून केली जाते आणि दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रांमधील तफावतीच्या संदर्भात नामनिर्देशन नमुना सादर करणाऱ्याला तपासणी सूची दिली गेली असल्याची खात्री करा.

१६. प्रत्येक उमेदवाराने दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्राची प्रत, शपथ पत्रासह निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या सूचना फलकावर नामनिर्देशन स्वीकारल्याच्या दिवशीच प्रदर्शित झाली असल्याची खात्री करा.

१७. नामनिर्देशन भरलेल्या उमेदवारांची विहित नमुन्यात तयार केलेली एकत्रित यादी, नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० नंतर मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे पाठवली असल्याची खात्री करा.

१८. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२७ अ अन्वये भित्तिचित्रे आणि माहितीपत्रक (पॅम्पलेट) यांच्या छपाईच्या प्रतिबंधासंबंधित आदेशाची प्रत, उमेदवाराला नामनिर्देशन दाखल करण्याच्या दिवशी, कळवण्यात आली असल्याची खात्री करा.

१९. छाननी पुरेशा कालावधीसह योग्य प्रकारे केली गेली आहे याची खात्री करा. वर्णलेखन (स्पेलिंग) तपासल्यानंतर वर्णानुक्रमाची खात्री करावी.

२०. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या (१९७१) ३ एससीसी ८७० च्या न्याय निर्णयानुसार शासकीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास ‘ लाभाचे पद ’ माहित आहे याची खात्री करा.

२१. छाननीनंतर तयार करण्यात आलेल्या नमुना-४ मधील वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी च्या २ प्रती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठविण्याची खात्री करा.

२२. निवडणूक लढविणाऱ्या उमेवारांची यादी अंतिम झाल्यानंतर उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी (नमुना ७-ए) तपासण्याची मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सादर करण्याची व्यवस्था करा.

२३. पुढीलप्रमाणे ३ टप्प्यांमध्ये प्रकाशित होणाऱ्या गुन्हेगारी पूर्ववृत्तावर, लक्ष ठेवा आणि त्यानुसार अहवाल सादर करा.

(क) उमेदवारी मागे घेतल्याच्या पहिल्या ४ दिवसांमध्ये.

(ख) त्यापुढील ५ ते ८ दिवसांदरम्यान.

(ग) ९ व्या दिवसापासून ते प्रचारमोहिमेच्या शेवटच्या दिवसापर्यंत (मतदानाच्या दिनांकापूर्वीचा आधीचा दुसरा दिवस.)

२४. निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व नामनिर्देशन पत्रे आणि इतर कागदपत्रे सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सुपूर्द करा.

## ☒ १०.२ हे करु नका

१. जुना चिन्ह आदेश व जुनी अपात्रता यादी वापरु नका.

२. नामनिर्देशनाच्या स्थळाजवळ अनधिकृतपणे जमण्यास परवानगी देऊ नका.

३. नामनिर्देशन स्थळे व्यक्तिशः किंवा काही वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तपासण्यास विसरु नका.

४. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने उमेदवार किंवा त्याच्या कोणत्याही प्रस्तावकाव्यतिरिक्त इतर कोणाकडूनही नामनिर्देशनपत्र स्वीकारु नये.

५. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या १०० मीटरच्या परिसराचे चिन्हांकन करण्यास विसरु नका.

६. नामनिर्देशनपत्र भरते वेळी उमेदवारासोबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या परिसरात ४ पेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश देऊ नका.

७. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी व जाहीर सूचनेत नमूद नसलेल्या ठिकाणी व वेळेत नामनिर्देशनपत्रे स्वीकारु नयेत (नमुना-एक).

८. एका उमेदवाराकडून ४ पेक्षा जास्त नामनिर्देशनाचे संच स्वीकारले जाणार नाहीत.

९. नामनिर्देशनपत्रे भरताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या १०० मीटरच्या परिसरात उमेदवाराला ३ पेक्षा जास्त वाहनांना परवानगी देऊ नका.

# इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी मतपत्रिका

## ☑ ११.१ काय करावे

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठीच्या मतपत्रिकेचे स्वरुप व भाषा—

(क) उमेदवारांची नावे संबंधित राज्याच्या अधिकृत भाषेत (राजभाषेत) आणि मतदारसंघाचे नाव इंग्रजीत छापण्यात येईल.

(ख) उमेदवारांची नावे ३ प्रवर्गाअंतर्गत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या सूचित (नमुना ७-ए) असतील त्याच क्रमाने क्रमबद्ध करावीत. मतपत्रिकेत प्रवर्गांची शीर्षके छापण्यात येऊ नयेत.

(ग) इव्हीएम मतपत्रिकेचे मतदान युनिटच्या बटणांशी/कळांशी संरेखन सुनिश्चित करा.

२. मतपत्रिकांच्या आवश्यकतेचे मूल्यमापन पुढील आधारावर करावे—

(क) मतदान केंद्रांची संख्या + १२ टक्के राखीव.

(ख) प्रदत्त मतपत्रिकांसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर २० मतपत्रिका.

(ग) मुद्दा (अ) व (ब) व्यतिरिक्त मतदान युनिटमध्ये मतपत्रिका लावताना फाटणे, सदोष मतपत्रिका यांसारखे आकस्मिक प्रसंग भागविण्यासाठी वरील संख्येच्या १० टक्के जादा मतपत्रिका छापता येतील.

३. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने पाठवलेल्या सविस्तर अनुदेशांनुसार मतपत्रिकांची छपाई—

(क) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी (नमुना ७-ए) त्याच दिवशी मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे व शासकीय मुद्रणालयाकडे पाठवण्यात यावी.

(ख) वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेची खात्री करण्यात येईल.

(ग) मुद्रण/प्रभारी अधिकारी संबध्द कागदपत्रांसह मुद्रणासाठी तात्काळ रवाना होईल.

## ☒ ११.२ हे करु नये

१. कडक सुरक्षा व्यवस्थेची तरतूद केल्याशिवाय मतपत्रिका छपाईची जागा निश्चित करू नका.

२. मतपत्रिकांचे मुद्रित पूर्णपणे तपासल्याशिवाय छपाईस सुरुवात करु देऊ नका.

३. विभिन्न प्रकारच्या मतपत्रिकांची छपाई करते वेळेस आणि त्या प्राप्त झाल्यावर ताबडतोब वरिष्ठ अधिकाऱ्याकडून तपासणी व पडताळणी करुन घेण्यास विसरु नका.

४. मतपत्रिकेच्या छपाईसाठी ७५ जी.एस.एम. पेक्षा कमी असलेल्या विहित रंगीत कागदाला परवानगी देऊ नका.

५. प्रमाणित सुरक्षाविषयक नियमांचे पालन केल्याशिवाय (प्रोटोकोलशिवाय) मतपत्रिकांची वाहतूक करु नका.

६. नकली (डमी) ब्रेल मतपत्रिका प्राप्त करण्यास विसरु नका.

# टपाली मतपत्रिका

## ☑ १२.१ काय करावे

१. पुढील मतदारांना टपालाद्वारे मतदान करण्याचा अधिकार आहे—

(क) **सेवा मतदार** (त्यांच्या जोडीदारासह)—(ज्यांनी बदली मतदानाचा पर्याय निवडला आहे ते वगळून)

(ख) **विशेष मतदार** (त्यांच्या जोडीदारासह)—ज्यांनी धारण केलेली पदे घोषित केलेली आहेत.

(ग) प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या अधीन असलेले मतदार.

(घ) निवडणूक कर्तव्यावर असलेले मतदार.

(ङ) अनुपस्थित मतदार— ज्येष्ठ नागरिक प्रवर्गातील अनुपस्थित उमेदवार (एव्हीएससी), दिव्यांग (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार (एव्हीपीडी), कोवीड-१९ (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार (एव्हीसीओ), अत्यावश्यक सेवा (प्रवर्गातील) अनुपस्थित मतदार (एव्हीईएस).

२. अशा व्यक्तींसाठीचे नियोजन व ओळख, पुरेशा आधीच चांगल्या पद्धतीने करायला पाहिजे. योग्य सुरक्षा व्यवस्थेची सुनिश्चिती करणे आवश्यक आहे.

# सेवा मतदारांना ई-मार्गाने पारेषित टपाल मतदान यंत्रणा (ई टी पी बी एस)

🕐 **एक.** नामनिर्देशन मागे घेण्याचा तारखेनंतर लगेचच वेळेवर मतदारांकरिता ‘ ईटीपीबीएस ’ तयार केला जात असल्याची खात्री करावी.

🕐 **दोन.** नामनिर्देशने मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या २४ तासांच्या आत सेवा मतदारांसाठी ऑनलाईन ‘ ईटीपीबीएस ’ संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांद्वारे पारेषित करावा.

🕐 **तीन.** निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सेवा मतदारांना ‘ ईटीपीबीएस ’ पारेषित करण्याच्या आणि प्राप्त करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी एका मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

🕐 **चार.** ज्यांनी बदली मतदानाचा पर्याय निवडला आहे अशा सेवा मतदारांना ईटीपीबीएस जारी केला जाणार नाहीत मतदार यादीच्या शेवटच्या भागात अशा मतदारांच्या नावासमोर ‘ वर्गीकृत सेवा मतदार ’ (सी.एस.व्ही) चिन्हांकित केलेले असल्याची खात्री करा.

🕐 **पाच.** ईटीपीबीएस पारेषित करण्याची व जमा करण्याची संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण (व्हिडीओग्राफ) करणे आवश्यक आहे.

# इतर प्रवर्गांसाठी टपाली मतपत्रिका

(क) नामनिर्देशने मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या ४८ तासांच्या आत टपाली मतपत्रिका छापण्याची खात्री करा.

(ख) टपाली मतपत्रिका/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र जारी करण्यासाठी विहित नमुन्यामध्ये विविध निवडणूक कर्तव्यांवर नियुक्त केलेल्या मतदारांकडून आणि अनुपस्थित मतदारांकडून अर्ज प्राप्त झाल्याची खात्री करावी.

(ग) टपाली मतपत्रिका आणि/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रासाठी विहित नमुन्यात प्राप्त झालेल्या अर्जानुसार संगणकीय आधारसामुग्री तयार केल्याची खात्री करावी.

(घ) पत्ता असलेले पाकीट तयार करा (नमुना १३बी व १३सी) नमुना १३डी (अनुदेश) पूर्ण करा आणि १३ए नमुना (घोषणापत्र) तयार ठेवला असल्याची खात्री करा.

(ङ) मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीत ज्यांना टपाली मतपत्रिका/ निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र जारी केले जाते त्यामध्ये मतदाराच्या नोंदीसमोर टपाली मतपत्रिका/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र (पीबी/ ईडीसी) असे चिन्हांकित केले याची खात्री करावी.

(च) निवडणूक निर्णय अधिकारी टपाली मतपत्रिका/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र जारी करण्याच्या व प्राप्त होण्याच्या संपूर्ण देखरेखीसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी नियुक्त करेल.

(छ) टपाली मतपत्रिका/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आणि जमा करुन घेण्यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय सुविधा केंद्रे उभारण्याची खात्री करा.

(ज) टपाली मतपत्रिका/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र जारी करण्याच्या आणि जमा करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण करणे आवश्यक आहे.

(झ) प्रत्येक सुविधा केंद्रावर सुरक्षा व सीसीटीव्ही कव्हरेजची योग्य व्यवस्था असल्याची सुनिश्चिती करावी.

(ञ) ज्याठिकाणी मतपत्रिका सुरक्षित अभिरक्षेत ठेवल्या जातात तो सुरक्षित कक्ष उघडण्यासाठी व बंद करण्याच्या नोंदीसाठी नोंदवही (लॉगबुक) ठेवली असल्याची खात्री करा.

ट. मतमोजणीच्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत जिल्हा टपाली प्राधिकाऱ्यांसोबत आगाऊ बैठका घेतल्याची सुनिश्चिती करावी आणि त्यांना संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला टपाली मतपत्रिका त्वरित वितरित करण्याची विनंती करावी.

(ठ) निवडणुकीच्या अधिसूचनेच्या पाच दिवसांच्या आत अनुपस्थित मतदारांकडून (एव्हीएससी, एव्हीपीडी, एव्हीसीओ, एव्हीईएस) नमुना १२डी गोळा केल्याची खात्री करावी.

(ड) अनुपस्थित मतदारांची टपाली मतपत्रिका (एव्हीएससी, एव्हीपीडी, एव्हीसीओ) त्यांच्या घरुन/रुग्णालयातून हस्तगत करण्यासाठी सुरक्षा, व्हीडिओग्राफर यांच्या पुरेशा पथकाची तयारी आणि प्रशिक्षण दिले असल्याची खात्री करावी.

(ढ) अनुपस्थित मतदारांची टपाली मतपत्रिका (एव्हीएससी, एव्हीपीडी आणि एव्हीसीओ) त्यांच्या घरी/रुग्णालयातून हस्तगत करण्यासाठी आणि त्यानुसार मतदारांना आणि उमेदवारांना माहिती देण्यासाठी मतदान पथकांसाठी वेळापत्रक आणि मार्गक्रम तक्ता तयार केल्याची सुनिश्चिती करा.

(ण) मतदान पथकांद्वारे अनुपस्थित मतदारांकडून (एव्हीएससी, एव्हीपीडी आणि एव्हीसीओ) मतदान केलेल्या टपाली मतपत्रिका जारी करणे आणि संकलन करणे आणि मतदानाच्या एक दिवस अगोदर प्रतिदिन तत्त्वावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर केला जातील याची सुनिश्चिती करा.

(त) टपाली मतपत्रिका आणि इतर कागदपत्रे असलेला नमुना १३सी गोळा करण्यासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या नियुक्तीची सुनिश्चिती करावी.

(थ) अनुपस्थित मतदारांसाठी (एव्हीईएस) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे विधानसभा मतदार संघामध्ये टपाली मतदान केंद्र (पीव्हीसी) निश्चित केल्याची खात्री करा.

(द) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे टपाली मतदान केंद्रात मतदानासाठी तीन तारखा निश्चित करणे आणि अनुपस्थित मतदारांना (एव्हीईएस) आणि निवडणूक लढवण्याच्या उमेदवारांना त्यांची माहिती दिल्याची सुनिश्चिती करणे.

## ☒ १२.२ काय करू नये

१. सेवा मतदारांना पाठवण्यापूर्वी ईटीपीबी तपासणे आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून मंजुरी घेणे विसरु नये.

२. योग्य सुरक्षा नियमां (प्रोटोकॉल) सह दुहेरी लॉकशिवाय इतर कोणत्याही ठिकाणी मतदान केलेल्या टपाली मतपत्रिका ठेवण्याची परवानगी देऊ नये.

३. आपत्कालीन छपाईसाठी मुद्रणालय (प्रिंटीग प्रेस) तयार ठेवण्यास विसरु नये.

४. मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या तासापेक्षा उशिरा प्राप्त झालेल्या टपाली मतपत्रिका मतमोजणीसाठी विचारात घेऊ नये.

५. मतदान झालेल्या टपाल मतपत्रिकेचा दैनिक अहवाल मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयात पाठवण्यास/अपलोड करण्यास विसरु नये.

६. घरुन केलेले मतदान/सुविधा केंद्र/पीव्हीसी करतेवेळी मतदानाची गुप्तता राखण्याबाबत मतदान पथकांना चेतावनी देण्यास विसरू नये.

# मतदानासाठी सर्वसाधारण व्यवस्था

## ☑ १३.१ काय करावे

१. भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यानुसार जिल्हा निवडणूक व्यवस्थापन आराखडा व जिल्हा जोखीम व्यवस्थापन आराखडा तयार करावा.

२. निरीक्षक/जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून पोलीस अधीक्षकामार्फत जिल्हा सुरक्षा आराखडा तयार करण्यात यावा.

**३. संप्रेषण योजना**

(क) संपर्क व्यक्ती/हरकारे (निरोप्या) (रनर)/पोलीस स्टेशन/पोलीस नाके यांच्या तपशिलांसह प्रत्येक मतदान केंद्रांमध्ये जवळ उपलब्ध असलेल्या दूरध्वनी क्रमांकांची यादी तयार करावी.

(ख) दूरध्वनी क्रमांकांची यादी तयार करावी.

(ग) मतदान केंद्राध्यक्ष, विभाग अधिकारी व क्षेत्रीय दंडाधिकारी यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकांची यादी तयार करावी.

(घ) निवडणूक पदाधिकारी व मतदान केंद्रांशी संबंधित सर्व संपर्क क्रमांक आणि तपशील जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर टाकावे.

(ड) जेथे दूरध्वनी/भ्रमणध्वनी उपलब्ध नाही तिथे मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्राशी संपर्क होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी छायांकित क्षेत्रांचे तपशील आणि संप्रेषणाच्या पद्धती जसे की, अति उच्च वारंवारता (VHF)/उच्च वारंवारता (HF) सहलग्नता यांची माहिती मिळवा.

**४. मतमोजणी योजना**

(क) मतदान झालेल्या ईव्हीएम (ए व बी) साठी आणि मतमोजणीसाठी ठिकाण निश्चित करा.

(ख) मतमोजणी केंद्रांचे प्रस्ताव मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत भारत निवडणूक आयोगाकडे मंजुरीसाठी पाठवा.

(ग) मतमोजणी कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेचा अंदाज घ्यावा.

(घ) दळणवळणाच्या इतर आनुषंगिक व्यवस्थेची खात्री करावी.

(ड) प्रसार माध्यमांची व्यवस्था.

(च) सुरक्षा व्यवस्था.

(छ) माहिती संप्रेषण व माहिती देणे.

(ज) कायदा व सुव्यवस्थेची व्यवस्था.

**५. मतदान कर्मचारी कल्याण योजना**—भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्याची नियुक्ती करावी आणि मतदान कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी व्यवस्थेची सुनिश्चिती करावी.

**६. विधानसभा प्रभाग निहाय निवडणूक योजना**

(क) मतदान केंद्राचा तपशील—एकूण संख्या मतदान केंद्रांचे वर्गीकरण—शहरी/ग्रामीण/मतदानाचे स्थान.

(ख) तयार करावयाचे क्षेत्र—एकाच सामाईक रस्त्यावर असलेल्यांचे मतदान केंद्रांचे एक क्षेत्र करावे.

**७. क्षेत्र व्यवस्थापन योजना**

(क) क्षेत्र अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसह अगोदर क्षेत्र तयार करावे.

(ख) क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय दंडाधिकारी/पोलीस फिरते पथक यांचे क्षेत्र एकच असेल.

**८. पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग (एसव्हीईईपी) योजना**—सर्व टप्प्यांसाठी लक्ष्यित केलेल्या कृतींचे नियोजन करावयाचे आहे.

**९. विविध उपक्रमांसाठी इमारती/परिसरांची निवड**

(क) मतदान कर्मचारी वर्गांचे प्रशिक्षण वर्ग इ.

(ख) ईव्हीएम आणि त्यांची साठवण (गोदामांची) तपासणे व तयार करणे.

(ग) प्रशिक्षणात वापरल्या जाणाऱ्या ईव्हीएम साठी साठवणुकीची जागा.

(घ) पहिल्या यादृच्छिकीकरणानंतर प्रथम स्तरीय तपासणी आणि ईव्हीएम विधानसभा मतदारसंघ निहाय साठवणुकीसाठी.

(ड) जावक (वितरण) केंद्रासाठी.

(च) मतदान झालेली ईव्हीएम सुरक्षित ठेवणे आणि मतमोजणी.

(छ) केंद्रीय बल/बाहेरील पोलीस दलांच्या भोजन आणि निवासासाठी.

(ज) आवश्यक असल्यास, मतदान कर्मचाऱ्यांच्या भोजन व निवासासाठी.

**१०. टोल फ्री क्रमांकासह नियंत्रण कक्ष/हेल्पलाईन**—सुसज्ज असणे.

**११. तक्रार संनियंत्रण कक्ष**—तक्रार नोंदवही ठेवण्यासाठी आणि तक्रारींचा त्वरित निपटारा करण्यासाठी पुरेशा सहायक कर्मचाऱ्यांसह मध्यस्थ (नोडल) अधिकारी (अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाचे) नियुक्त करावे.

**१२. माहिती तंत्रज्ञानासंबंधित उपक्रम**—किमान एक अनुदेशक (प्रोग्रामर) आणि दोन डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचा समावेश असलेली तांत्रिक पथक जिल्हा स्तरावर पूर्णवेळ उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**१३. निवडणूक खर्चाचे संनियंत्रण :**

(क) निवडणूक खर्च संनियंत्रण पथकाचे अधिकारी आणि कर्मचारी व पायाभूत सुविधा.

(ख) निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या विविध पथकांची ओळख, नियुक्ती व प्रशिक्षण.

**१४. सर्वसाधारण व्यवस्थेसाठी कर्मचारी प्रति नियुक्त करणे आणि विविध कक्षांची निर्मिती**—खालील मध्यस्थ (नोडल) अधिकारी आणि संबंधित कक्षासाठी नेमून द्यावयाची कर्तव्ये :

(क) मनुष्यबळ व्यवस्थापनासाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ख) प्रशिक्षण व्यवस्थापनासाठी (मध्यस्थ) अधिकारी.

(ग) निवडणूक साहित्याच्या व्यवस्थापनासाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(घ) परिवहन व्यवस्थापनासाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ड) संगणकीकरण, सायबर सुरक्षा आणि माहिती तंत्रज्ञानासाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(च) पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूक विषयक सहभाग (SVEEP) यांसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(छ) कायदा व सुव्यवस्था, संवेदनशीलता मापन (व्हीएम) आणि सुरक्षा योजनेसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ज) ईव्हीएम व्यवस्थापनासाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(झ) आदर्श आचारसंहिता (एमसीसी) यांसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ञ) खर्च संनियंत्रणासाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ट) मतपत्रिका, टपाली मतपत्रिका आणि 'ईटीपीबीएस' साठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ठ) प्रसार माध्यमांसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ड) संप्रेषण योजनेसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ढ) मतदार यादीसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(ण) तक्रार निवारण व मतदारसंपर्क सेवा (हेल्पलाईन) साठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

(त) निरीक्षकांसाठी मध्यस्थ (नोडल) अधिकारी.

**१५.** निवडणूक जाहीर झाल्यानंतर सोयीस्कर वाटेल तितक्या वेळा राजकीय पक्ष/स्थायी समितीच्या बैठका घ्याव्या.

(क) स्वतंत्र व निष्पक्ष निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता पाळण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था सहकार्य करण्याचे आवाहन.

(ख) कार्यवृत्त तयार करावे.

(ग) निव्वळ औपचारिकता म्हणून वापरू नये.

**१६. प्रसार माध्यम कक्ष :**

(क) मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

(ख) प्रसार माध्यमांसोबत बैठका घ्याव्या.

(ग) निवडणूक खर्च संनियंत्रण व पैसे देऊन छापलेल्या बातम्या या (पेड न्यूज) संदर्भातील नवीन मार्गदर्शक तत्त्वांबद्दल प्रसिद्धी द्यावी.

(घ) नामनिर्देशनपत्रे, प्रतिज्ञापत्र इत्यादी आणि इतर कार्यक्रमांची माहिती द्यावी.

(इ) इतर संबंधित माहिती सामायिक करावी.

(च) मतदानाच्या दिवशी आणि मतमोजणीच्या दिवशी प्रक्षेपणाची खात्री करावी.

(छ) प्राधिकृत पत्र जारी करण्याची सुनिश्चिती करावी.

**१७. निरीक्षकांसाठी सुविधा— पुढील व्यवस्थेची सुनिश्चिती करणे.—**

(अ) भोजन, निवास, वाहतूक आणि सुरक्षा यांची व्यवस्था.

(ब) लेखनसामग्री, बिनतारी संदेशवहन, मार्गदर्शक आणि सचिवालयीन साहाय्य पुरविण्यात यावे.

(क) फॅक्स सुविधेसह एक दूरध्वनी सेवा.

(ड) मतदारसंघाचे नकाशे, मतदान केंद्रांची यादी, मतदार याद्या अंतर्भूत असलेले तक्ते, दूरध्वनी क्रमांक, निवडणुकीचे आणि मतमोजणीचे नियोजन असणारी पुस्तिका देण्यात यावेत.

(इ) मानवंदना देऊ नये.

(फ) प्रत्येक निरीक्षकाला,—

🕐 तो मतदारसंघात पोहचल्यापासून छायाचित्रणकार ;

🕐 इतर साहाय्यभूत कर्मचारी वृंदांसह मतदारसंघाची चांगली माहिती असणारा संपर्क अधिकारी ; पुरविण्यात यावेत.

**१८. जिल्हा दंडाधिकाऱ्याने निर्गमित करावयाचे विवक्षित आदेश :**

(क) शस्त्रांचा परवाना निलंबित करणे.

(ख) विवक्षित प्रकरणांत (आवश्यकता वाटल्यास) फौजदारी प्रक्रिया संहिता याच्या कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश काढणे.

(ग) संपत्तीचे विरुपण (प्रतिबंध अधिनियम) या अन्वये आदेश काढणे.

(घ) मद्यविक्रीकर प्रतिबंध घालणे (दारु बंदी दिन घोषित करणे).

(ङ) ध्वनिक्षेपकांच्या वापरासंदर्भात आदेश काढणे.

(च) आदर्श आचार संहितेच्या आणि निवडणूक घेण्याबाबतचे नियम याच्या संबंधित तरतुदी शासकीय कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे.

(छ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या संबंधित तरतुदींन्वये विवक्षित अधिकाऱ्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे अधिकार निहित करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठविणे.

(ज) पेट्रोल, तेल, वंगणाचा राखीव साठा ठेवण्यासाठी पेट्रोल पंपाच्या मालकासाठी आदेश काढणे.

(झ) आदर्श आचार संहितेचा आणि निवडणूक खर्चाच्या सनियंत्रणाची भारत निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे यासंबंधीच्या अनुपालनाकडे राजकीय पक्ष आणि उमेदवार यांचे लक्ष वेधणे.

(ञ) सर्वसामान्य जनतेमध्ये उमेदवार/राजकीय पक्ष/अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याकडून दाखविली जाणारी प्रलोभने, आमिष इत्यादी संदर्भातील जनजागृतीच्या बाबतीत आवाहन करणे.

## ☒ १३.२ हे करु नये

१. निरीक्षकांसाठी माहिती पुस्तिका तयार ठेवण्याचे विसरु नये.

२. मतदानाच्या दिवसाच्या १-२ दिवस अगोदर रंगीत तालीम करून अद्ययावत संवाद आराखडा मिळण्यास विसरु नये.

३. १९५० ची यथोचित अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तपासणी करण्याचे विसरु नये.

# कायदा व सुव्यवस्था

## ☑ १४.१ काय करावे

१. घोषणा झाल्यापासून विशेष मोहिमा सुरु करणे—

(क) मागील दोन सार्वत्रिक निवडणूकांच्या कालावधीत निवडणूकाविषयक गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तीच्या यादीचे संकलन करणे.

(ख) सराईत गुन्हेगार, घोषित फरारी आणि परागंदा गुन्हेगारांची यादी अद्ययावत करणे.

(ग) प्रलंबित वॉरंट्स/चलाने बजावल्याची सुनिश्चिती करणे.

(घ) प्रलंबित निवडणूकविषयक गुन्ह्यांचा तपास/खटला जलदगतीने चालविणे.

(ङ) अवैध मद्यनिर्मिती कारखाने शोधणे व त्यांवर जप्तीची कारवाई करणे.

(च) अवैध शस्त्राचा आणि अशी शस्त्रे व दारुगोळ्याच्या स्थानिक उत्पादकांच्या ठिकाणांचा कसून शोध घेणे व त्यावर जप्तीची कारवाई करणे तसेच नियमित धाडी टाकून गुन्हेगारांना अटक करणे.

(छ) शस्त्र परवाने आणि दारुगोळा दुकानांची १०० टक्के छाननी करणे.

(ज) परवानाप्राप्त शस्त्रे बाळगण्यास बंदी असणाऱ्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेशाचे अनुपालन होत असल्याची सुनिश्चिती करणे.

(झ) शस्त्रे आणि दारुगोळ्यांच्या अवैध व्यापाराला आणि समाजविरोधी घटकांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने ट्रक आणि व्यापारी वाहनांच्या आंतरराज्यीय व राज्यांतर्गत हालचालीची तपासणी करावी.

(ञ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०७, ११६/१०९ यांअन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करावी.

२. विशेष मोहिमांच्या वरील मुद्यांवरील मतदार संघनिहाय माहिती अद्ययावत करुन संकलित केल्याची सुनिश्चिती करणे.

३. निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर निवडणुका पूर्ण होईपर्यंत नवीन शस्त्र परवाने देऊ नये. केवळ अपरिहार्य परिस्थितीत, छाननी समितीशी विचारविनिमय करुन शस्त्रे परवाने देण्यात यावेत.

**४. परवानाप्राप्त शस्त्रांसाठी अनामत ठेव :**

(क) निवडणुकीच्या घोषणेनंतर लगेचच, प्रचलित कायद्यांन्वये सर्व परवानाधारकांचा तपशील बनवावा आणि वैयक्तिक पुनर्विलोकन व मूल्यांकन करावे.

(ख) मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांना आणि निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यात अडथळा ठरणाऱ्या परवानाप्राप्त शस्त्रांना कायदेशीररित्या जप्त करण्यात यावे.

**५. शस्त्रे आणि दारुगोळयांची वाहतूक—**

(क) कोणतेही अनिष्ट घटक किंवा शस्त्रे व दारुगोळ्याची वाहतूक केली जात नसल्याची खातरजमा करण्यासाठी मतदानापूर्वीच्या तीन दिवसांपासून ते मतमोजणी होईपर्यंत काटोकोरपणे दक्षता घेतली जात असल्याची आणि जड वाहने, हलकी वाहने आणि इतर सर्व वाहनांची कसून तपासणी केली जात असल्याची सुनिश्चिती करणे.

(ख) जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या ‘ ना हरकत प्रमाणपत्रासह ’ केवळ वैध कागदपत्रांच्या आधारे, आंतरराज्यात शस्त्रे व दारुगोळा यांचा पुरवठा होत असल्याची सुनिश्चिती करावी. हा पुरवठा प्रत्यक्ष मालप्रेषितीलाच होत असून कोणत्याही अनधिकृत व्यक्तींच्या हाती जात नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**६. विश्वास निर्माण करणाऱ्या उपाययोजना—**मतदानाच्या दिवशी धमकी/अडथळा अशी कृत्ये होणार नाहीत याची खातरजमा करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. जिल्हा पोलीस अधीक्षकांसोबत दौरे करावेत आणि विविध समाजघटकांना भेटून शासनाच्या व्यवस्थांची माहिती द्यावी.

**७. मद्याचे संनिरीक्षण, उत्पादन व वितरण, इत्यादी,—**

(क) आयएमएफएल/बिअर/देशी दारुचे उत्पादन, मध्यवर्ती साठ्यांकडून आगाऊ मागणी (उचल), परवानाधारक साठेकऱ्याची साठा मर्यादा, दररोजची आवक/किरकोळ विक्रेत्यांकडून आगाऊ मागणी (उचल) आणि दारुची दुकाने उघडण्याची व बंद करण्याची वेळ यांचे बारकाईने संनिरीक्षण करणे.

(ख) निवडणुकीची अधिसूचना जारी झाल्यापासून ते मतदानापर्यंत जिल्हा स्तरावरील उत्पादन शुल्काच्या समन्वय अधिकाऱ्याकडून प्रत्येक दिवशी अहवाल मिळत असल्याची सुनिश्चिती करावी.

**८. कायदा व सुव्यवस्था अहवाल,—**

(अ) पोलीस प्राधिकाऱ्यांकडून नमुन्यात (एलओआर-नमुना-१) मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास पाठविण्यासाठी जिल्ह्याच्या दैनंदिन कायदा व सुव्यवस्थेच्या अहवालाच्या संकलनाची व्यवस्था करावी.

(ब) निवडणुकांची घोषणा झाल्यापासून ते त्या पूर्ण होईपर्यंत दैनंदिन अहवाल मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास पाठविण्यात यावा.

**९. निवडणूक कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीं विरोधात कारवाई—**

(अ) व्यक्तींकडून मतदार याद्या व निवडणुका यासंबंधातील चुकीच्या घोषणापत्रांच्या बाबतीत कायदेशीर तरतुदींच्या उल्लंघनाच्या प्रकरणांत आणि निवडणूक आयोजनाशी संबंधित अधिकृत कर्तव्यार्थ असणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या उल्लंघनाच्या प्रकरणांत कारवाई करण्यात यावी.

(ब) मतदान नोंदणी अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडून, कसूरदार व्यक्तींविरुद्ध, अदखलपात्र गुन्ह्यांच्या प्रकरणात, सक्षम न्यायालयात तक्रारी दाखल करुन तर, दखलपात्र गुन्ह्यांच्या प्रकरणात प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवून कारवाई सुरु करण्यात यावी.

(क) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४६८ व ४६९ यांअन्वये मुदतीच्या दृष्टीने विलंब टाळण्यात यावा.

**१०. जिल्हा सुरक्षा तैनाती योजना—**

(अ) केंद्रीय सशस्त्र पौलीस दले आणि राज्य सशस्त्र पोलिसांचा परिपूर्ण आणि इष्टतम वापर केला जात असल्याची खातरजमा करण्यात यावी.

(ब) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तुकड्यांची दोन समान भागात विभागणी करण्यात यावी. (पोलीस अधीक्षक संबंधित क्षेत्र बंडखोर/नक्षलवाद्यांपासून मुक्त असल्याचे प्रमाणित करावे). तसेच, जी क्षेत्रे बंडखोरी/आतंकवाद/नक्षलवादाने ग्रस्त आहेत अशा ठिकाणी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तुकड्यांचे विभाजन करण्यात येऊ नये.

(क) जिल्हा दंडाधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात यावी आणि निरीक्षकांकडून मान्यता घेण्यात यावी—निरीक्षकाच्या पूर्वमंजुरीशिवाय कोणताही फेरफार करण्यात येऊ नये.

**केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य पोलीस यांची भूमिका—**

(क) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलास आंदोलन इत्यादींसाठी राखीव ठेवण्यात येऊ नये.

(ख) केंद्रीय सशस्त्र पोलीस दलास मतदानाच्या अगोदर दोन दिवसांपर्यंत पथ संचलनाचे आयोजन (शक्यतो पायी फेरी असावी), मतदारांमध्ये विश्वास निर्माण करणे, सीमांची तपासणी करणे इत्यादींद्वारे त्या क्षेत्रावर नियंत्रण) मिळविण्याच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणले जावे.

(ग) मतदानाच्या दिवशी, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलास मतदान केंद्रे, मतदान साहित्य, मतदान कर्मचारी आणि मतदान प्रक्रिया यांच्या सुरक्षेच्या कर्तव्यार्थ नेमण्यात यावे. आणि त्यांना कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी दिली जाऊ नये.

(घ) भारत निवडणूक आयोगाच्या अनुदेशानुसार, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या कर्मचाऱ्यांसाठी वाहनांचे अधिग्रहण व निवास व्यवस्थेची तरतूद असल्याची खातरजमा करावी.

(ङ) जर स्टेशन हाऊस अधिकाऱ्याकडून (एसएचओ) पोलीस ठाण्यामध्ये नियुक्त केल्यास आणि जिल्हा दंडाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांद्वारे जिल्हयात नियुक्त केले असल्यास-—संबंधित क्षेत्रातील आव्हानांसंबंधी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या कर्मचाऱ्यांना थोडक्यात माहिती द्यावी.

११. अति संवेदनशील मतदान केंद्रे आणि अति संवेदनशील क्षेत्रे वेळेत शोधण्याची खातरजमा खात्री करावी.

१२. खबरदारीच्या दृष्टीने सुरक्षित मापनाचा अवलंब करावा.

(क) संवेदनशील मतदार/मतदारांचा समूह यांची स्पष्टपणे निवड करावी.

(ख) अशा संवेदनशीलतेला कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्ती/घटक यांची निवड करावी.

(ग) आगाऊ नियोजन करावे आणि पुरेशी सुधारात्मक कार्यवाही हाती घ्यावी.

(घ) पुरेसे आधी अशा क्षेत्रांची निवड करण्यासाठी क्षेत्र अधिकाऱ्यांनी निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच तयारीत रहावे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वाहनाच्या सोयीसह सर्व प्रकारची मदत देण्यात यावी.

(ङ) व्हीएम-निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नमुन्यांचे संकलन केल्याची सुनिश्चिती करावी आणि अहवाल तयार करुन तो मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास व्हीएम-जिल्हा निवडणूक अधिकारी या नमुन्यात पाठवावा.

(च) अशा ठिकाणांना जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांसोबत वारंवार भेटी द्याव्यात आणि जिल्हा गुप्तचर यंत्रणेकडून नियमित अभिप्राय घ्यावेत.

(छ) उमेदवार/राजकीय पक्षांशी संवाद साधावा.

(ज) समाजविघातक व्यक्तींचा मागोवा घेण्यासाठी ठाणे स्तरावर विशिष्ट अधिकारी पदनिर्देशित करण्यात यावा.

(झ) प्रत्येक संवेदनशील ठिकाणी जबाबदार असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव त्याच्या संपर्क क्रमांकासह एटीआरप्रमाणे पाठवलेल्या नमुन्यात नमूद करण्यात यावे.

(ञ) मतदानाच्या दिवसाच्या ५ दिवस अगोदर पोलीस अधीक्षकासोबत संयुक्तपणे एटीआर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास सादर करावा.

(ट) मतदान केंद्रनिहाय धोकाग्रस्त बाबींचा आराखडा निरीक्षकास, तो आल्यावर, देण्यात यावा.

(ठ) संभाव्य धमक्या आणि दमबाजीच्या घटनांबाबत कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षकांसोबत कृती आराखडा तयार करावा व फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०७/११६/१५१ अन्वये कार्यवाही करावी. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना पोलीस ठाण्यात हजर राहण्याची सक्ती करावी. पोलीस पिकेट्सची व्यवस्था करावी व अधिकाऱ्यांकडून तेथे भेटी देण्यात याव्यात.

(ड) मतदानाच्या दिवशी पोलिसांची गस्त पथके संवेदनशील ठिकाणी गस्त घालत असल्याची आणि नियंत्रण कक्षाला तसे कळवत असल्याची सुनिश्चिती करावी. आवश्यकता असेल तेथे पोलीस पिकेट्स लावण्यात यावीत.

(ढ) अशा संवेदनशील ठिकाणांची यादी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या कमांडर्सना देण्यात यावी, जेणेकरुन अशा लोकवस्त्यांमध्ये विश्वास निर्मितीच्या उपाययोजना करण्यासाठी त्यांना भेटीचे आयोजन करता यावे.

## १४.२ हे करू नये

सुरक्षा दल तैनातीची माहिती कोणालाही देऊ नये किंवा त्यासंदर्भात कोणत्याही अधिकारी-कर्मचाऱ्यांना माध्यमांशी काहीही बोलण्यास परवानगी देऊ नये.

२. शांततापूर्ण निवडणूक घेण्यासाठी उपलब्ध सुरक्षा दलांचा इष्टतम वापर करून घेण्यास विसरू नये.

३. पोलीस आणि नागरी सेवा कर्मचाऱ्यांना बिगरसमान क्षेत्रांची वाटणी करण्यास अनुमती देऊ नये.

४. अविवेकीपणाने सुरक्षा दलांऐवजी इतर बाबी योजू नयेत.

५. निरीक्षकाची परवानगी मिळाल्याशिवाय जिल्हा तैनाती योजनेत फेरफार करू नये.

६. निवडणूक आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय राज्य पोलीस आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल यांव्यतिरिक्त इतर दले तैनात करू नयेत.

७. कायदा व सुव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी आणि आंदोलनांसाठी राखीव म्हणून केंद्रीय सशस्त्र पोलीस दलास तैनात करू नये.

८. मतदान केंद्रामध्ये कर्तव्यार्थ तैनात केलेल्या केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या जागी स्थानिक पोलिसांना नेमू नये.

९. निकाल घोषित झाल्यावर एक आठवड्यानंतर ताबडतोब, परवानाधारकांकडून ताब्यात घेतलेल्या सर्व बंदुका त्यांना परत करण्यास विसरू नये.

# आदर्श आचार संहिता

## ✓ १५.१ काय करावे

१. निवडणूक जाहीर झाल्याच्या दिवसापासून मतदारसंघात आदर्श आचार संहिता लागू होते.

२. **प्रसिद्धी**

क. आदर्श आचार संहितेच्या तरतुदी, काय करावे आणि काय करु नये याची उदाहरणादाखल यादी, निवडणूक विषयक गुन्हे आणि भ्रष्ट पद्धती याबाबतच्या कायदेशीर तरतुदी आणि भारत निवडणूक आयोगाचे निदेश राजकीय पक्ष/उमेदवार यांच्या बरोबरच्या बैठकांमध्ये स्पष्ट कराव्यात.

ख. उमेदवारांच्या नामनिर्देशनांच्या वेळी भारत निवडणूक आयोगाच्या निदेशांच्या प्रति निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने उमेदवारांना द्याव्या.

ग. मुद्रित/इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यम इत्यादीद्वारे व्यापक प्रचार करावा.

३. क. निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये सुरू असणारे कार्यक्रम चालू ठेवता येतील.

ख. पूर, अवर्षण, रोगराई आणि इतर नैसर्गिक-आपत्तींनी बाधित झालेल्या क्षेत्रांतील लोकांसाठी साहाय्य आणि पुनर्वसनाच्या उपाययोजनांना प्रारंभ करता येईल आणि चालू ठेवता येतील.

ग. असाध्य रोगाने ग्रासलेल्या किंवा गंभीर आजारी व्यक्तींना यथोचित मान्यतेसह रोख रक्कम किंवा वैद्यकीय सुविधा देणे चालू ठेवता येईल.

घ. निवडणुकीच्या सभा घेण्यासाठी मैदानांसारखी सार्वजनिक ठिकाणे सर्व पक्षांसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध असतील याची सुनिश्चित करणे. सर्वांना समान संधी मिळणे सुनिश्चित करण्यासाठी हॅलिपॅडचा वापरसुद्धा निःपक्षपातीपणे व्हायला हवा.

ङ. स्थानिक पोलिसांना प्रस्तावित सभेचे ठिकाण आणि वेळेचे पूर्ण माहिती आगाऊ देण्यात आली आहे आणि सर्व आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आहेत याची सुनिश्चिती करणे.

च. राजकीय पक्षांच्या/उमेदवारांच्या प्रस्तावित सभेच्या ठिकाणी जर कोणतेही निर्बंधक किंवा प्रतिबंधात्मक आदेश, कोणतेही असल्यास, त्याची पूर्णतः अंमलबजावणी करण्यात येईल.

छ. सभेत व्यत्यय आणणाऱ्या किंवा अन्यथा शांतताभंग करणाऱ्या व्यक्तींवर कार्यवाही करण्यासाठी पोलिसांचे साहाय्य घेण्यात यावे.

ज. कोणतीही मिरवणूक सुरु होण्याची/समाप्तीची वेळ आणि ठिकाण आणि मार्ग अगोदरच ठरविण्यात यावा.

झ. प्रचार कालावधीत आणि मतदानाच्या दिवशी वाहने चालविण्यावरील निर्बंधांची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

ञ. मतदार, उमेदवार आणि त्यांचे निवडणूक/मतदान प्रतिनिधी वगळता, केवळ भारत निवडणूक आयोगाकडून विशिष्ट वैध प्राधिकारपत्र असलेल्या व्यक्तींनाच केवळ कोणत्याही मतदान केंद्रात प्रवेश करता येईल. उच्च पदावर असलेले कोणतेही अधिकारी (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, खासदार किंवा आमदार इत्यादी) यांना सुद्धा या अटी वगळण्यात येणार नाही.

त. निवडणुक घेण्यासंदर्भातील कोणतीही तक्रार किंवा अडचण, निरीक्षक/निवडणूक निर्णय अधिकारी/क्षेत्र दंडाधिकारी/भारत निवडणूक आयोग यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

४. प्रचाराचा कालावधी संपल्यावर, मतदार नसलेल्या राजकीय कार्यकर्त्यांच्या मतदारसंघातील उपस्थितीवर निर्बंध.

क. त्या मतदारसंघातील मतदार किंवा उमेदवार किंवा उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी नसलेले राजकीय कार्यकर्ते प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदारसंघ सोडून जातील याची सुनिश्चिती करणे.

ख. बाहेरील लोकांचा शोध घेण्यासाठी सामूहिक सभागृह/अतिथी गृह इत्यादी परिसर तपासाण्यात यावा.

५. प्रचार कालावधी दरम्यान वाहने चालविण्यावरील निर्बंध :

क. मोटार वाहन अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून वाहने चालविणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करणे.

ख. कोणतेही संभाव्य अपकृत्य किंवा गुन्हेगारी कृत्ये जसे की, अवैध शस्त्रे, बेकायदेशीर दारू आणि समाज विघातक घटक यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर बारीक लक्ष ठेवणे

– अशी वाहने निवडणुकीपर्यंत सोडू नये – संबंधित कायद्यान्वये दंडात्मक कारवाई देखील करण्यात यावी.

ग. प्रचार मोहिमेच्या प्रयोजनासाठी वापरली जाणारी वाहने केवळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने चालविली जातील याची खात्री सुनिश्चिती करा. वाहनाचा क्रमांक व उमेदवाराचे नाव असणारा मूळ परवाना वाहनाच्या पुढील भागातील काचेवर लावण्यात यावा.

घ. नामनिर्देशन भरताना खात्री करून घ्या की, निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या १०० मीटरच्या परिसरात जास्तीत जास्त ३ वाहने येण्याची परवानगी असेल.

ङ. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७(१)(क) अन्वये पक्षाच्या नेत्याने भेट दिल्यास, रस्त्याच्या प्रवासासाठी वाहनांचे परवाने मुख्य निवडणूक अधिकाऱ्याद्वारे वेगवेगळ्या रंगांमध्ये मध्यवर्ती ठिकाणांहून जारी करण्यात येतील.

च. अधिसूचनेच्या दिनांकापासून निवडणूका पूर्ण होईपर्यंत, १० पेक्षा अधिक वाहनांच्या ताफ्याला (संरक्षित व्यक्तीच्या सुरक्षेच्या श्रेणीनुसार असलेली सुरक्षा वाहने वगळून) परवानगी देण्यात येणार नाही याची सुनिश्चिती करणे – वाहनांचा मोठा ताफा किमान २०० मीटरचे किमान अंतर राखून विभागण्यात यावा.

६. मद्यविक्री दिन घोषित केल्याची सुनिश्चिती करणे. मतदानाच्या दिवशी आणि मतदान संपल्यानंतर ४८ तासांच्या कालावधीसाठी आणि मतमोजणीच्या दिवशी मद्याची विक्री, मद्य दिले किंवा वितरित करण्यात येणार नाही.

७. राजकीय प्रयोजनांसाठी धार्मिक संस्थांचा गैरवापर होणार नाही याची सुनिश्चिती करणे :

क. कोणत्याही रीतीने निवडणूक प्रचारासाठी धार्मिक स्थळांचा वापर करण्यास मनाई असेल धार्मिक संस्था आणि धार्मिक संस्थाच्या निधीचा वापर कोणतीही राजकीय कल्पना किंवा राजकीय कार्य यांचा प्रचार किंवा प्रसारासाठी किंवा कोणत्याही राजकीय पक्षाच्या हितासाठी करणे हा अपराध असेल आणि धार्मिक संस्था (गैरवापर प्रतिबंध) अधिनियम, १९८८ अन्वये शिक्षापात्र असेल.

८. मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेवर (तासाला) संपणाऱ्या ४८ तासांच्या कालावधीदरम्यान राजकीय स्वरूपाचे मोठ्या प्रमाणातील (लघुसंदेशांचा) प्रसार होणार नाही याची सुनिश्चिती करणे.

९. सकाळी ६-०० वाजण्यापूर्वी आणि रात्री १०-०० नंतर वाहनांवर किंवा कोणत्याही सभेसाठी ध्वनिक्षेपक वापरले जाणार नाही याची सुनिश्चिती करणे.

१०. उमेदवार/मुख्य प्रचारकांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याच्या घटनांचा मागोवा घेण्यासाठी पक्षनिहाय नोंदवही ठेवणे– त्यात आचारसंहितेच्या भंगाबाबत, भंग केल्याचे दिनांक, करण्यात आलेली कारवाई आणि देण्यात आलेले आदेश याविषयी थोडक्यात वर्णन देणे. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांद्वारे किंवा मुख्य प्रचारकाद्वारे आदर्श आचारसंहितेचा कोणत्याही प्रकारे भंग झाल्यास त्याची माहिती भारत निवडणूक आयोगाला देण्यात द्यावी.

११. पत्रिका, भित्तीपत्रके इत्यादी छापण्यावर निर्बंध.

क. लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ क च्या तरतुदींचे मुद्रक आणि प्रकाशक अनुपालन करत आहेत याची सुनिश्चिती करणे.

ख. सर्व निवडणूकपत्रिका, भित्तिपत्रिका इत्यादींची यादी जिल्हा दंडाधिकारी यांच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यत येईल.

१२. क. सक्षम समितीने प्रमाणित केल्यानंतरच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील सर्व राजकीय जाहिराती प्रसारित ध्वनिक्षेपित करण्यात आल्या आहेत याचे जिल्हा प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती संनियंत्रण करेल याची सुनिश्चिती करणे.

ख. प्रमाणपत्राशिवायची राजकीय जाहिरात आढळून आल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

ग. आदर्श आचार संहिता लागू असतानाच्या रेडिओ चॅनेलवर (खाजगी एफ एम चॅनलसह) राजकीय स्वरुपाच्या वाणिज्यिक जाहिरातींच्या प्रसारणाच्या संदर्भात तीन स्तरांवर स्थापन करण्यात आलेल्या समित्यांद्वारे प्रसारणपूर्व छाननी आणि प्रमाणनाबाबत भारत निवडणूक आयोगाचे अनुदेश रेडिओवरील जाहिरातींना देखील लागू होतील.

## ✖ १५.२ काय करू नये

१. करारनिविष्ट काळात सत्तेत असलेले पक्ष/शासन यांच्या कामगिरींचे चित्रण करणारे होर्डिंग्स, घोषणाफलके, कापीव चित्रे काढून टाकण्यास विसरू नये.

२. आदर्श आचार संहितेबाबतच्या स्थायी समितीसोबत बैठक घेण्यास विसरू नये.

३. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदारसंघात मतदार नसलेल्या बाहेरील लोकांचा शोध घेण्यासाठी सामूहिक सभागृह/ अतिथीगृह इत्यादी परिसर तपासण्यास विसरू नये.

४. निवडणूक जाहीर झाल्याच्या ७२ तासांच्या आत चालू कामांची/अद्याप सुरू न झालेल्या कामांची यादी मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठविण्यास विसरू नये.

५. सत्तेत असलेल्या पक्षाच्या/शासनाच्या कामगिरीसंबंधी सार्वजनिक राजकोषाच्या खर्चावर कोणत्याही जाहिरातींना परवानगी देऊ नये.

६. कोणताही मंत्री, उमेदवार किंवा मतदान करण्यासाठी आलेला मतदार नसेल तर, कोणत्याही मतदान केंद्रात आणि मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश करू शकत नाही.

७. अधिकृत सुरक्षारक्षक किंवा खाजगी सुरक्षा रक्षक असलेल्या कोणत्याही व्यक्तीला निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करू नये.

८. स्वेच्छाधीन निधीतून कोणतेही अनुदान/प्रदाने मंजूर करु नये.

# निवडणूक खर्चावर संनियंत्रण

## ✓ १६.१ काय करावे

१. निवडणूक जाहिर झाल्यानंतर ३ दिवसांच्या आत, आयोगाच्या अनुदेशांच्यासंदर्भात सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसोबत बैठक बोलवा आणि कायदेशीर तरतुदी त्यांना स्पष्ट करून सांगा आणि सूचनांच्या संग्रहाची एक प्रत त्यांना द्या. तसेच खर्चाच्या विविध दरांची चर्चा करा आणि दर तक्त्याच्या अधिसूचनेपूर्वी त्यांच्या सूचनांचा विचार करा.

२. खर्च संनियंत्रण समितीमार्फत सर्व निवडणूक प्रतिनिधींसाठी/ उमेदवारांसाठी स्वतःच्या कार्यालयात दोन सुविधा प्रशिक्षणे आयोजित करा.

३. लोकांना नैतिक मतदानासाठी आवाहन करा आणि लाच घेणारे आणि देणारे दोघेही कायद्यान्वये शिक्षेस पात्र असतील याबाबत त्यांना शिक्षित करा निवडणूक प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणात रोख रक्कम स्वतःजवळ बाळगणे टाळण्याचे जनतेला आवाहन करा.

४. खर्च संनिरीक्षण पथकात काम करणाऱ्या कर्मचारीवर्गाला आणि निवडणूक प्रतिनिधींना प्रशिक्षण द्या. खर्च संनिरीक्षण पथकांमध्ये तैनात करण्यात येणाऱ्या सर्व कर्मचारीवर्गासाठी २-३ टप्प्यांमध्ये प्रशिक्षणाची योजना तयार करा.

५. संसदीय मतदारसंघाचे जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि केंद्र सरकारचा त्यात माहिती प्रसारण अधिकारी (कोणताही असल्यास) आणि १ नागरिक/भारतीय प्रेस परिषदेचा नामनिर्देशित पत्रकार/ जिल्हा जनसंपर्क अधिकारी (डीपीआर ओ) किंवा जिल्हा माहिती अधिकारी (डीआयओ) समकक्ष-सदस्य सचिव यांचा समावेश असलेली जिल्हास्तरीय प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती तयार करा .

६. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यासाठी तपासणी सूची- निवडणूका जाहीर होण्यापूर्वी

क. आयकर, सीमाशुल्क विभाग आणि केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग किंवा केंद्र सरकार किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील इतर लेखा विभागांतील अधिकाऱ्यांमधून सहायक खर्च निरीक्षक पदासाठी अधिकाऱ्यांची निश्चिती करा.

ख. भरारी पथकासाठीच्या मनुष्यबळ (प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी एक किंवा अधिक), स्थैतिक संनियंत्रण पथकासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी ३ किंवा अधिक) आणि चित्रिकरण (व्हिडीओ) संनियंत्रण पथकासाठी (प्रत्येक प्रति विधानसभा मतदारसंघासाठी एक किंवा अधिक) कर्मचारीवर्गाची निश्चिती करा.

ग. चित्रिकरण दृकश्राव्य (व्हिडीओ) संनियंत्रण पथक, भरारी पथक आणि स्थैतिक संनियंत्रण पथक यांच्यासाठी आवश्यक असणारे व्हिडीओ कॅमेरे प्राप्त करा.

घ. प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीसाठी टीव्ही जोडणीसह टिव्ही/संगणकाची व्यवस्था करा.

ङ. खर्च संनिरीक्षण कार्यक्रमासाठी राज्य पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील मध्यस्थ अधिकाऱ्यांचा शोध घ्या ते मुख्य प्रशिक्षक असतील.

च. जेथे प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्यात आला होता अशा मागील निवडणुकीतील सर्व प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करा आणि त्यास तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचवा.

छ. भरारी पथक/स्थैतिक संनियंत्रण पथकासाठी कार्यकारी दंडाधिकारी म्हणून अधिसूचित करता येईल अशा अधिकाऱ्याचा शोध घ्या.

ज. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला खर्चाच्या संनियंत्रणासाठी मध्यस्थ अधिकारी म्हणून निश्चित करा आणि त्यांचे नाव, दूरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक आणि भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी भारत निवडणूक आयोगाकडे पाठवा. तो सर्व खर्च संनिरीक्षण अधिकाऱ्यांसाठी मुख्य प्रशिक्षण असेल.

झ. मागील वर्षभरातील जिल्ह्यातील मद्याचे दैनंदिन उत्पादन, वितरण आणि साठवणूक यांची आकडेवारी मिळवा.

ञ. मागील निवडणुकीतील तक्रारी, त्या क्षेत्राची साक्षरता आणि आर्थिक विकास याच्या आधारावर जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघातील खर्च संवेदनशील क्षेत्र खंड आणि जिल्ह्यातील खर्च संवेदनशील मतदारसंघ निश्चित करा आणि महाविद्यालये आणि शाळेचे विद्यार्थी, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना

आणि सीएसओ यांच्या सहभागाने नैतिक मतदान मोहिमेसाठी योजना मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत आयोगाला सूचित करा.

७. **निवडणुका जाहीर झाल्यानंतर**

क. पुढील कारणांसाठी बँकांसोबत बैठकीची व्यवस्था करा उमेदवारांसाठी तात्काळ बँक खाते उघडणे आणि चेकबुक जारी करण्याची सुविधा.

-रु. १ लाख रुपयांपेक्षा अधिक संशयास्पद व्यवहाराचा अहवाल पाठवणे.

-अर्थ मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एटीएम व्हॅनसाठी अनुसरायची कार्यपद्धती.

ख. सामानाच्या तपासणीसाठी जिल्ह्यात हेलिकॉप्टर उतरणाच्या परवानगीसाठी मार्गदर्शकतत्त्वे पहा.

ग. निवडणूक प्रचार खर्चाच्या वेगवेगळ्या बाबींचा दर तक्याच्या अधिसूचनेसाठी जिल्ह्यातील राजकीय पक्षांसोबत बैठक आयोजित करा आणि निवडणूक खर्च संनियंत्रणावरील अनुदेशांच्या सारसंग्रहाची एक प्रत त्यांना सुपूर्द करा.

घ. सर्व निवडणूक खर्च संनियंत्रण पथके कार्यरत असल्याची सुनिश्चिती करा.

ङ. टोल फ्री क्रमांकासह जिल्हास्तरीय तक्रार संनियंत्रण कक्ष कार्यरत असल्याची सुनिश्चिती करा.

च. पक्ष/उमेदवारांच्या खर्चाच्या पडताळणीसाठी सर्व मेळाव्यांचे व्हिडिओचित्रण केले जात असल्याची सुनिश्चिती करा.

छ. जिल्हास्तरीय राज्य उत्पादन शुल्क विभाग विहीत नमुन्यात अहवाल सादर करत असल्याची सुनिश्चिती करा.

८. अधिसूचनेनंतर

क. स्थिर संनियंत्रण पथक कार्यान्वित असल्याची आणि ते खर्चविषयक संवदेनशील क्षेत्र खंडामध्ये/प्रमुख रस्त्यांवर कार्यरत असल्याची सुनिश्चिती करा.

ख. नामनिर्देशाचा अर्ज भरण्यासाठी उमेदवारांना योग्य नोंदवह्या आणि नमुने/प्रतिज्ञापत्र (नमुना-२६) दिलेले असल्याची सुनिश्चिती करा.

ग. निवडणूक अधिसूचनेच्या ७ दिवसांच्या आत, मुख्य निवडणूक अधिकारी आणि भारत निवडणूक आयोग यांना प्राप्त झालेल्या मुख्य प्रचारकांच्या यादीची नोंद घ्या.

घ. नामनिर्देशनाच्या छाननीच्या दिनांकाला निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्तरावर उमेदवार किंवा प्रतिनिधींचे प्रशिक्षण आयोजित केले असल्याची सुनिश्चिती करा.

९. निवडणूक पूर्ण झाल्यानंतर

क. निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सर्व उमेदवारांना खात्याची नोंद करण्याबाबत पत्र पाठवा आणि त्या नोटिशीमध्ये सुविधा प्रशिक्षणाचा दिनांक नमूद करा.

ख. निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्याच्या अंतिम दिनांकाच्या एक आठवड्याच्या आत, सर्व निवडणूक प्रतिनिधी/ उमेदवार आणि खाते प्राप्त करण्याचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसाचे सुविधा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करा.

ग. सामान्य लोकांपर्यंत माहितीचा व्यापक प्रसार होण्यासाठी सर्व उमेदवारांच्या विवरणाच्या गोषवाऱ्याची प्रत (भाग एक ते भाग सहा) शक्यतो उमेदवाराद्वारे निवडणूक खर्चाच्या हिशेबाची नोंद केल्यानंतर ३ दिवसांच्या आत, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर टाकावी.

घ. निवडणूक लढणाऱ्या सर्व उमेदवारांची आणि त्यांच्या खात्यात दर्शविल्याप्रमाणे त्यांच्या निवडणूक खर्चाची यादी तयार करावी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या सूचना फलकावर लावावी.

ङ. जिल्हा खर्च संनियत्रण समितीच्या मदतीने, प्रत्येक उमेदवाराने सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबाची छाननी करा आणि योग्य पद्धतीने न दाखवलेल्या खर्चाच्या संदर्भात २४ तासांच्या आत नोटीस जारी करा, आणि अशा तफावतीच्या संदर्भात उमेदवारांकडून ४८ तासांच्या आत उत्तर मागवा.

च. उमेदवाराला, त्याच्या उत्तरावर जिल्हा खर्च संनियत्रण समितीचा निर्णय लेखी कळवा.

छ. खर्च निरीक्षकाच्या छाननी अहवालावर त्यांचा शेरा मिळवा आणि निकाल घोषित झाल्यापासून ३७ दिवसांच्या आत विहित नमुन्यात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत आयोगाकडे पाठवा.

ज. प्रत्येक उमेदवाराचा छाननी अहवाल आठवड्याच्या आत एनकोअर (ENCORE) वर नोंदवायचा आहे.

## ✕ १६.२. काय करू नये.

१. उमेदवारांच्या निवडणूक प्रतिनिधींना खर्चाची नोंदवही हाताळण्याबाबत प्रशिक्षण देण्यास विसरू नये.

२. कोणताही विवाद/विसंगती टाळण्यासाठी उमेदवारांच्या खर्चाच्या नोंदवहीसोबत खर्चाची अभिरूप (शॅडो) नोंदवहीचा वारंवार ताळमेळ घालण्यास विसरू नये.

३. चित्रीकरण सर्वेक्षण पथक आणि चित्रीकरण पाहणाऱ्या पथकाद्वारे पाठविलेली (व्हीव्हीटी) ध्वनीमुद्रिका नियमितपणे पाहण्याचे आणि सहायक खर्च निरीक्षकांसह तपशील पाठविण्यास विसरू नये.

४. पेड न्युजच्या सिद्ध झालेल्या प्रकरणांच्या खर्चाबाबत नोंद दाखल करण्यास विसरू नये.

५. लेखा पथकाद्वारे ठेवण्यात आलेल्या पुराव्याची संचिका (Folder) क्यू-शिट आणि अभिरूप खर्च नोंदवहीची योग्य देखभालीची सुनिश्चिती करण्यास विसरू नये.

६. यथोचित प्रक्रियेचे अनुपालन केल्यानंतर मतदानाच्या दिवसाच्या ७ दिवसांच्या आत, कोणत्याही निवडणूकविषयक जोडणीशिवाय जप्त केलेली रक्कम परत करायला विसरू नये.

# मतदानासाठी व्यवस्था

## १७.१ काय करावे

१. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम झाल्यानंतर लगेचच मतदानासाठी आवश्यक ती व्यवस्था करावी आणि निर्धारित दिनांकास (दिनांकांना) मतदान घेण्यासाठी सर्व काही सज्ज असल्याची खात्री करावी.

२. प्रत्येक मतदारसंघात मतदान घेण्यासाठी राखीव मतदान यंत्रांसह नेमकी किती मतदान यंत्रे आवश्यक आहेत, याचे आगाऊ निर्धारण करा.

३. प्रत्येक संसदीय मतदारसंघातील/विधानसभा मतदारसंघातील मतदानात आणि प्रशिक्षण/जाणीवजागृतीच्या वापरासाठी वाटप केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची आणि व्हीव्हीपीएटीची पहिल्या टप्प्यातील तपासणी पूर्ण करा.

४. पहिले आणि दुसरे यादृच्छिकीकरण (रॅण्डमायझेशन) पूर्ण झाल्यानंतर, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपीएटीचे वाटप केवळ मतदानासाठी केले आहे याची खात्री करा.

५. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी शेवटचा तास राहिल्या-नंतरच्या ४८ तासांच्या आत जिल्हा स्तरावर टपाली मतपत्रिकांची छपाई करण्यात येईल.

६. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपासून २४ तासांच्या आत सेवा मतदारांना संबंधित कागदपत्रांसह ईटीपीबीएस पाठवल्याची सुनिश्चिती करा.

७. मतदान यंत्रांच्या मतदान युनिटांवर वापरल्या जाणाऱ्या आणि प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापर करण्यासाठी मतदान केंद्रांना पुरवठा करण्याकरिता आवश्यक संख्येतील मतपत्रिका भारत निवडणूक आयोगाच्या निदेशांनुसार त्वरित छापण्यात याव्यात.

८. मतदान घेण्यासाठी लागणारे इतर सर्व मतदान साहित्य, सांविधिक व असांविधिक नमुने व इतर लेखनसामग्री वेळेत खरेदी करणे.

९. मतदार माहिती चिठ्ठ्यांची वेळेत छपाई करणे/खरेदी करणे व त्यांचे मतदारांना वाटप करणे याची सुनिश्चिती करणे.

१०. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी, साहित्यासह मतदान पथके मतदान केंद्रावर पोहोचली आहेत की नाही याची खात्री करा.

११. निवडलेल्या मतदान केंद्रांवर व्हिडिओग्राफर तैनात करण्यासाठी व्यवस्था केली असल्याची सुनिश्चिती करा.

१२. निवडलेल्या मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रियेचे थेट वेब-कास्टिंग करण्याची व्यवस्था केली असल्याची सुनिश्चिती करा.

१३. मतदारसंघातील प्रत्येक मतदान केंद्रासाठी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांच्या औपचारिक नियुक्तीचे आदेश देणे. अधिकाऱ्यांना तैनात करण्यासंबंधातील कोणतीही तातडीची गरज भागविण्यासाठी पुरेसे राखीव मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी नियुक्त केले आहेत याचीही खात्री करा.

१४. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपीएटीवर निवडणुका घेण्याबाबत मतदान कर्मचारीवर्ग तसेच पोलीस कर्मचारीवर्ग यांच्यासाठी सर्वंकष व परिपूर्ण प्रशिक्षणे आयोजित केल्याची सुनिश्चिती करा.

१५. पोलीस, व्हिडिओग्राफर्स, वेबकास्टिंगसाठीच्या तंत्रकुशल व्यक्ती, सूक्ष्म निरीक्षक आणि अधिग्रहण केलेल्या वाहनांचे चालक/क्लिनर आणि अनुपस्थित मतदार यांच्यासह मतदान कर्मचारीवर्गाला टपाली मतपत्रिका आणि निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रासाठी अर्जाचे नमुने (नमुना १२, १२ए आणि १२डी) दिले असल्याची सुनिश्चिती करा.

१६. मतदान कर्मचारी वर्ग आणि मतदान साहित्याच्या वाहतुकीसाठी लागणारी वाहने अधिग्रहित केल्याची सुनिश्चिती करा.

१७. मतदान पथकांची ने-आण करण्याशी ताळमेळ घालण्यासाठी पोलिस बले तैनात करणे आणि त्यांची ने-आण करणे हे तपासून घ्या.

१८. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची प्रत्यक्ष संख्या आणि मतदान केंद्रांची एकूण संख्या लक्षात घेता सांविधिक व असांविधिक नमुने इत्यादींसह लागणाऱ्या मतदान साहित्याचा आढावा घ्या.

१९. प्रत्येक मतदान केंद्रावर वापरण्यासाठी मतदार यादीतील संबंधित भागांच्या आवश्यक संख्येतील कार्यप्रती तयार केल्याची खात्री करा.

२०. मतदान केंद्रांच्या ठिकाणाविषयी प्रसिद्धी द्या.

२१. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना पुढील बाबी पुरविल्या आहेत याची खात्री करा :—

क. मतदान केंद्रांच्या याद्या आणि प्रत्येक मतदान केंद्रांतर्गत येणाऱ्या क्षेत्रांची यादी.

ख. मतदानप्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्याबाबतची प्रपत्रे.

ग. प्रत्यक्ष मतदानासाठी वापरण्यात येणारी मतदार यादीची मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना द्यावयाची तीच प्रत.

२२. निश्चित केलेल्या मतदान केंद्रासाठी नियुक्त केले जाणारे केंद्र सरकारच्या विभागांचे सूक्ष्म निरीक्षक.

२३. मतदानानंतर मतदान पथकांना परत येण्यासाठी आणि त्यांच्याकडून विनिर्दिष्ट केंद्रांवर मतदान यंत्रे व इतर साहित्य व निवडणूक विषयक कागदपत्रे प्राप्त करून घेण्यासाठी सुयोग्य चिन्ह फलक असलेल्या स्वीकृती केंद्रावर व्यवस्था केल्याची खात्री करणे.

२४. मोहोरबंद इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, मतदान केंद्राध्यक्षांच्या दैनंदिन्या, नमुना १७ए (मतदार नोंदवही), नमुना-१७ सी आणि विहित प्रपत्रामध्ये अतिरिक्त माहितीसह इतर महत्त्वाच्या सांविधिक बाबी विशेष केंद्रावर गोळा करण्यासाठी व्यवस्था केली असल्याची सुनिश्चिती करा.

२५. मतदान संपल्यानंतर मतनोंदणी केलेली मतदान यंत्रे (ए व बी) व इतर निवडणूक कागदपत्रे ठेवण्यासाठी सुरक्षित कक्षाची व्यवस्था केल्याची सुनिश्चिती करा. सी व डी प्रकारच्या यंत्रांची स्वतंत्र जागेत स्वतंत्रपणे साठवणूक केल्याची सुनिश्चिती करा.

२६. सर्व मतदान केंद्रे/वितरण केंद्रे व स्वीकृती केंद्रांमध्ये अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी विद्युत विभागाला सूचना द्या.

२७. वितरण/स्वीकृती केंद्रांवर पॉवर बॅकअपसाठी करावयाची आवश्यक व्यवस्था.

२८. मतदानाच्या दिवशी तक्रारींचे त्वरित निवारण, संप्रेषण आणि अहवाल देण्यासाठी पुरेसे कर्मचारी/पायाभूत सुविधा असलेला नियंत्रण कक्ष स्थापन करा.

२९. मतदानानंतर कागदपत्रांच्या छाननीचा दिनांक, वेळ आणि ठिकाण, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना कळवले आहे याची सुनिश्चिती करा.

## १७.२ काय करू नये.

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपीएटी वाहून नेणाऱ्या वाहनांचे जीपीएस ट्रॅकिंग पी-२ दिवशी किंवा लागू असेल त्याप्रमाणे सराव (ड्राय रन) करण्यास विसरू नका.

२. पी-२/३ पथकाची ने-आण करण्यासाठी, कोणतेही असल्यास, मतदान कर्मचारीवर्गाचे अगोदरच यादृच्छिकी-करण करण्यास विसरू नका.

३. ए, बी, सी, डी श्रेणीतील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी यांच्या साठवणुकीचे नियोजन करण्यास आणि ते उमेदवारांना कळवण्यास विसरू नका.

४. मतदान केंद्रांवर ४ अनिवार्य भित्तीपत्रके (पोस्टर्स) लावायला विसरू नका :

क. मतदान क्षेत्र विनिर्दिष्ट करणारी सूचना.

ख. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी.

ग. ओळख पटविण्यासंबंधातील पर्यायी कागदपत्रे आणि मतदान कसे करावे.

घ. मतदारांसाठी काय करावे आणि काय करू नये.

५. मतदान कर्मचाऱ्यांना आणि क्षेत्र अधिकाऱ्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपीएटी बदलण्याच्या नियमांची आठवण करून द्यायला विसरू नका.

६. नमुना-१७ ए आणि इतर कागदपत्रांची निवडणुकीनंतर छाननी करण्याच्या पूर्ण कालावधीतील व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याच्या बाबतीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला आठवण करून द्यायला विसरू नका.

७. निवडणूक याचिकेचा (ईपी) कालावधी पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक संस्थांमध्ये मतदान यंत्रे ठेवू नका.

८. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कोणतेही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपीएटी हलवू नका.

९. मतदानाच्या दिवशी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र अभियंत्यांना एकाच ठिकाणी ठेवू नका.

१०. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र अभियंत्यांची संख्या क्षेत्र अधिकारी/मतदान केंद्राध्यक्षांना कळविण्यास विसरू नका.

११. पी-१ दिवशी वेबकास्टिंगचा सराव (ड्राय रन) करायला विसरू नका.

१२. मतदानाच्या दिवशी वेबकास्टिंगवर देखरेख ठेवण्यास आणि देखरेख कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या परिस्थितीत करावयाच्या कार्यवाहीची माहिती देण्यास विसरू नका.

# तक्रार व्यवस्थापन

## १८.१ काय करावे

१. तक्रार संनियंत्रण यंत्रणा (सीएमएस) आणि भारत निवडणूक आयोग-राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टल (ईसीआय-एनजीएस पोर्टल) अंतर्गत अपर जिल्हा दंडाधिकाऱ्याने (एडीएम) तक्रार निवारण यंत्रणेवर देखरेख ठेवणे.

२. ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारच्या तक्रारींचे नियमित, वेळेवर आणि योग्य प्रकारे निवारण होईल याची खात्री करा.

३. तक्रारींचे प्रभावी रीतीने निवारण व्हावे, यासाठी तक्रारींचे स्वरूप व विषयाची निकड लक्षात घेऊन तक्रारींचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करावा.

४. राष्ट्रीय तक्रार सेवा पोर्टल किंवा राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टलवर- मेलद्वारे किंवा डाकेद्वारे प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे डिजिटायझेशन करावयाचे आहे आणि नंतर राष्ट्रीय तक्रार निवारण पोर्टलमध्ये नोंदणी करावी.

५. मतदार मदत (हेल्पलाईन) क्रमांक १९५० योग्य रीतीने कार्यरत आहे याची खात्री करा.

६. दक्ष नागरिक (सीव्हिजिल) उपयोजकाद्वारे प्राप्त तक्रारींचे विहित मुदतीत निवारण होईल याची खात्री करा.

७. मुद्रण (प्रिंट)/इलेक्ट्रॉनिक/समाज माध्यमावरून प्राप्त होणाऱ्या तक्रारी-राजकीय पक्षांचे आचरण तसेच त्यांनी मांडलेल्या तक्रारींवर राज्य, जिल्हा व उप-जिल्हा स्तरांवर प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून बारकाईने लक्ष ठेवावे.

८. पुढील बाबी लक्षात घेऊन प्रभावी तक्रार निवारण यंत्रेणेचे व्यवस्थापन करावे :

क. कालबद्ध रीतीने तक्रारींचे निवारण.

ख. तक्रारींचे योग्य प्रकारे निवारण करण्यावर भर.

ग. तक्रारी पुढे पाठविणे आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (एटीआर) जलद गतीने मिळविणे.

घ. तक्रारदाराला पुन्हा प्रतिसाद देणे.

ङ. उत्तरदात्याची जबाबदारीही निश्‍चित करणे.

## १८.२ काय करू नये.

१. तक्रारींचे निवारण करण्यासाठी अपेक्षेपेक्षा जास्त वेळ घेऊ नका.

२. खरी वस्तुस्थिती आणि आकडेवारी नमूद केल्याशिवाय मोघम उत्तर देऊ नका.

३. वेगवेगळ्या माध्यमांतून प्राप्त झालेल्या तक्रारींची सद्य:स्थिती शोधण्याची व्यवस्था करून तक्रारदारांना अभिप्राय द्यायला विसरू नका.

४. दक्ष नागरिक सी-व्हिजिल हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुरेसे प्रशिक्षण द्यायला विसरू नका.

५. तक्रारींच्या संख्येचे वेगवेगळ्या वर्गवारीनुसार विश्लेषण करायला विसरू नका.

६. दक्ष नागरिक (सी-व्हिजिल) प्लॅटफॉर्मवर दररोज प्राप्त झालेल्या तक्रारींच्या निवारणासाठी लागणारा सरासरी वेळ, तक्रारींच्या निवारणाचा दर, लागणारा जादा वेळ यांचे निरीक्षण आणि विश्लेषण करण्यास विसरू नका.

# पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणुकीविषयक सहभाग आणि प्रसारमाध्यम

## १९.१ काय करावे

१. कमी मतदार नोंदणी व कमी सहभाग असणाऱ्या क्षेत्रांवर भर देऊन पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणुकविषयक सहभाग आणि योजना तयार करणे.

२. मतदारांचा सहभाग वाढविण्याकरिता योग्य उपाययोजना करण्यासाठी राज्य आणि जिल्हा अशा दोन्ही स्तरावर समाज माध्यमावरील आशय व प्रतिसाद यांचे नियमित विश्लेषण करणे.

३. या योजनेचे शहरी उदासिनता, लिंगविषयक भेदभाव, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी, वेश्या, स्थलांतरित मजूर, वंचित घटक इत्यादी यांवर आधारित आपले लक्ष केंद्रित करावे.

४. विविध वर्षांच्या दिनदर्शिकेत महत्त्वपूर्ण कार्यक्रम तयार करण्यात यावेत.

५. जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्यासाठी प्रादेशिक भाषांवर भर देणे.

६. माध्यम प्रमाणपत्र व संनियंत्रण समिती पुनर्गठित करणे आणि नियमित बैठका आयोजित करणे.

७. जिल्हा माध्यम प्रमाणपत्र व संनियंत्रण समितीद्वारे उमेदवारांची पूर्व-प्रमाणन विनंती विचारात घेण्यात येईल.

८. पैसे देऊन केलेल्या बातम्या (पेड न्यूज) इत्यादींच्या संबंधातील तक्रारींचे/समस्यांचे सर्व सदस्यांनी संनियंत्रण व्यवस्थेमार्फत परीक्षण करणे.

९. निवडणूक कालावधी दरम्यान, निवडणूक व्यवस्थापन समस्यांबाबत कोणतीही चुकीची माहिती प्रसारित करण्यात येत असल्यास, त्या घटनेची सत्य वस्तुस्थिती कळवावी आणि जिल्हा स्तरावर उभारलेल्या माध्यम केंद्रामार्फत शंकांचे निरसन करावे.

१०. माध्यम नियंत्रण समिती, नामनिर्देशन, स्पष्टीकरण, मतमोजणी इ. आणि इतर स्पष्टीकरणे यांवरील माहिती देण्याकरिता, जाहीर दिनांकापासून मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांना माहिती देण्याकरिता मध्यस्थ (नोडल) अधिकाऱ्यासह एक प्रसारमाध्यम कक्ष स्थापन करण्यात येईल.

११. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या आणि मतमोजणी प्रक्रियेच्या बातम्यांसाठी निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या यादीनुसार माध्यम कर्मचाऱ्यांना आणि वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींना अधिकृत परवनगी पत्राचे वितरण करण्यासाठी व्यवस्थेची सुनिश्चिती करणे.

## १९.२ काय करू नये.

१. जनतेला समजणे कठीण होईल अशाप्रकारे नवीन काही तयार करू नका.

२. जाणीवजागृती निर्माण करण्यासाठी जिल्हा आयकॉन सेवेचा उपयोग करण्यास विसरु नका.

३. निवडणुकविषयक विविध मुद्यांचे माध्यम कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास विसरु नका.

४. कोणत्याही संवेदनशीलतेचा भंग होईल किंवा तिच्या विसंगत असेल असे नवीन काही तयार करू नका.

५. विविध निवडणूक प्रक्रिया आणि मुक्त व निष्प्रभ निवडणुकांची सुनिश्चिती करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना यांवरील संक्षिप्त माहिती माध्यमांना नियमितपणे देण्यास विसरु नका.

६. अन्वेषणाखाली असलेला कोणताही प्रसंग, माध्यमांनी कळवल्यास तात्पुरते उत्तर पाठवण्यास विसरु नका.

७. पद्धतशीर मतदार शिक्षण व निवडणूकविषयक सहभाग याखाली कोणताही अनाठायी खर्च हाती घेऊ नका.

# मतमोजणी व्यवस्था

## २०.१ काय करावे

१. सुरक्षित कक्ष व्यवस्था :

क. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे आठवड्यातून २-३ वेळा आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे दररोज सकाळी आणि दुपारी सुरक्षित कक्षाची तपासणी करणे आणि त्यानुसार विहित केलेल्या प्रपत्रावर अहवाल मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना सादर करणे.

ख. निवडणूक निर्णय अधिकारी निश्चित केलेल्या वेळी (सकाळी ८-०० वा.) मतमोजणी सुरू करील आणि सुरक्षित कक्ष उघडण्याची वेळ (सकाळी ६-३०) उमेदवारांना आणि निरीक्षकांना कळवील.

२. मतमोजणी केंद्रावरील पायाभूत सुविधांची व्यवस्था :

क. मतमोजणी समाप्त होईपर्यंत मतमोजणी केंद्रावर अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी संबंधित प्राधिकरणाला पत्र पाठविण्यात यावे. अखंडित वीज पुरवठा होण्यासाठी पर्यायी वीज बॅकअपच्या व्यवस्थेची सुनिश्चिती करावी.

ख. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या ओळखपत्राशिवाय कोणत्याही व्यक्तीला परवानगी असणार नाही.

ग. सुरक्षित कक्ष/मतमोजणी केंद्र येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याची सुनिश्चिती करणे.

घ. निरीक्षकांसाठी दूरध्वनी व फॅक्स असलेली स्वतंत्र खोली किंवा लहान कक्ष यांसह पुरेशा सुविधांची व्यवस्था करणे.

ङ. मतमोजणीची माहिती आणि नवीनतम कल प्रसारित करण्यासाठी मतमोजणी केंद्रावर प्रसारमाध्यम केंद्राची स्थापना करणे आणि प्रसारमाध्यमातील व्यक्तींना दळणवळणाच्या पुरेशा सुविधा पुरविणे.

३. मोहोरबंद करण्याची व्यवस्था :

क. मतांची मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (मतदान युनिटे व नियंत्रण युनिटे) आणि व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्समधून काढलेल्या छापील कागदी चिठ्ठ्या असलेले लिफाफे त्याच सुरक्षित कक्षात ठेवण्यात येतील. सर्व नियंत्रण युनिटे आणि रिकामे व्हीव्हीपीएटी यांचे वीजसंच (पॉवरपॅक) काढल्यानंतर स्वतंत्रपणे ठेवण्यात येतील.

ख. सर्व सांविधानिक कागदपत्रे गोपनीय मोहोरेने मोहोरबंद करण्यात येतील, परंतु त्याच्या पेटीच्या कुलुपाला अशी मोहोर असणार नाही. या पेट्यांची कुलुपे फक्त निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मोहोरेने मोहोरबंद असतील.

ग. मतमोजणी संपल्यानंतर, गोपनीय मोहोरांच्या वापराची सुनिश्चिती करणे आणि पुढील २४ तासांच्या आत भारत निवडणूक आयोगाकडे सुरक्षितपणे परत करणे.

४. कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित बाबी :

क. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र असलेल्या सुरक्षित कक्षाची २४×७ दुपदरी सुरक्षा, सीसीटीव्ही व्याप्तीक्षेत्र नोंदवही ठेवणे, पोलीस व नागरी नियंत्रण कक्ष.

ख. मतमोजणी केंद्रास तीनपदरी सुरक्षाकडे करणे.

ग. दुपदरी (दोन टप्प्यात) झडती घेणे.—महिलांसाठी विशेष व्यवस्थेची सुनिश्चिती.

घ. सर्वांचा सुरळीत व वेळेत प्रवेश होण्यासाठी पुरेशा संख्येत धातूशोधक द्वार चौकटी बसवाव्यात.

ङ. पहिल्या सुरक्षा कड्याच्या ठिकाणी कार्यकारी दंडाधिकारी तैनात करणे.

च. मतमोजणी केंद्रावर पोलीस नियंत्रण कक्ष - देखरेख करण्यासाठी सर्वोच्च दर्जाचे पोलीस.

छ. मतदानोत्तर कार्यकृतींसाठी राजकीय पक्षांसोबत/उमेदवारांसोबत बैठक.

ज. प्रतिबंधात्मक आदेश - मतमोजणीच्या दिवशी " मद्य विक्री प्रतिबंध दिवस " (ड्राय डे) घोषित करणे.

झ. राजकीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात विशेष पहारा देणे.

ञ. पुढे चालू ठेवावयाची प्रतिबंधात्मक उपाययोजना.

५. मतमोजणी कार्यपद्धती :

क. टपाली मतांची प्रथम मोजणी करावयाची आहे आणि अशी मोजणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या टेबलवर करण्यात येईल.

ख. निरीक्षकाकडून ना हरकत प्राप्त झाल्यानंतरच निकाल घोषित करावयाचा आहे.

ग. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून नमुना **२१ सी** किंवा **२१ डी** मध्ये निकाल घोषित करण्यात यावा.

घ. निवडणुकीचा निर्णय नमुना **२१ ई** मध्ये तयार करण्यात येईल.

ङ. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे निवडणुकीचे प्रमाणपत्र योग्य पोचपावतीसह नमुना २२ मध्ये देण्यात येईल.

च. मतमोजणीची प्रक्रिया थांबल्यास किंवा स्थगित केल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी सर्व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी आणि निवडणूक कागदपत्रे मोहोरबंद करतील.

## २०.२ काय करू नये.

१. संपूर्ण आढावा घेतल्याशिवाय आणि नियोजन केल्याशिवाय मतमोजणी केंद्र अंतिमतः निश्चित करू नका.

२. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास **एनकोअरमध्ये** (ENCORE) काळजीपूर्वक माहिती भरण्याची आठवण करून देण्यास विसरू नका.

३. अखंडित वीज पुरवठा करण्याबाबत वीज प्राधिकरणास पत्र लिहिण्याचे विसरू नका.

४. मतमोजणीपूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची/व्हीव्हीपीएटीची कोणतीही वाहतूक करण्यास परवानगी देऊ नका.

५. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपीएटी यांची सुरक्षित कक्षातून मतमोजणी सभागृहापर्यंत विनासंरक्षण वाहतूक करण्यास परवानगी देऊ नका.

६. मतमोजणीच्या पहिल्या दिवशी (C-1 day) माहिती तंत्रज्ञान प्रणालीची तालीम घेण्यास विसरू नका.

७. मतमोजणी केंद्रावर प्रस्तावित व्यवस्था करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून पूर्वपरवानगी घेण्याचे विसरू नका.

८. कोणत्याही परिस्थितीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर नोंदलेल्या प्रत्यक्ष मतांचे छायाचित्र घेण्यात येणार नाही किंवा त्याचे कोणतेही दृक-श्राव्य वृत्तांकन करण्यात येणार नाही.

९. यादृच्छिकपणे निवडलेल्या पाच मतदान केंद्रांच्या व्हीव्हीपीएटी चिठ्ठ्यांची मोजणी करण्यास विसरू नका.

१०. मतमोजणी गट आणि मतमोजणी प्रतिनिधी यांच्याकरिता स्वतंत्र प्रवेश करण्याची व बाहेर जाण्याची व्यवस्था सुनिश्चित करण्याचे विसरू नका.

११. सुरक्षित कक्षातून मतमोजणी सभागृहात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र-व्हीव्हीपीएटी घेऊन जाण्याचा आणि परत येण्याचा मार्ग एकच असू देऊ नका.

१२. कागदी चिठ्ठ्या सटकू नयेत म्हणून, मोजणी बूथमध्ये बारीक धाग्यांच्या जाळीने व्हीव्हीपीएटीच्या चिठ्ठ्या व्यवस्थित संरक्षित करण्याची सुनिश्चिती करण्याचे विसरू नका.

१३. व्हीव्हीपीएटी - चिठ्ठ्या मोजणी बुथच्या छतावर सीसीटीव्ही बसवण्याची सुनिश्चिती करण्याचे विसरू नका.

१४. मतमोजणीस प्रारंभ करण्यापूर्वी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२८ अन्वये मतदानाची गुप्तता राखण्यासाठीची प्रतिज्ञा घेण्याची निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास आठवण करून देण्यास विसरू नका.

१५. फेरीनिहाय मतमोजणीच्या निकालांवर निरीक्षकांच्या सह्या घेण्याची निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास आठवण करून देण्यास विसरू नका.

१६. प्रत्येक मतमोजणी टेबलावरील मतमोजणी प्रतिनिधींच्या नमुना **१७ सी** च्या भाग-दोनवर सह्या घेण्याची निवडणूक अधिकाऱ्यास आठवण करून देण्यास विसरू नका.

१७. एनकोअरवर (ENCORE) अपलोड करण्यापूर्वी फेरीनिहाय हाताने आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतमोजणी निकालांचा हिशोब करण्यासाठी स्वतंत्र पथक तैनात करण्यास विसरू नका.

१८. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना मतदानाच्या दिनांकाच्या तीन दिवस आधी, मतमोजणीचा दिनांक, वेळ आणि ठिकाण याबाबत कळवण्याची सुनिश्चिती करण्यास विसरू नका.

# माहिती तंत्रज्ञान उपयोजके

## २१.१ काय करावे

१. आयोगाची उपयोजके लोकप्रिय करण्यासाठी संबंधित हितसंबंधित व्यक्तिंकरिता/वापरकर्त्यांसाठी प्रशिक्षण आणि जाणीवजागृती कार्यक्रमांचे आयोजन करणे :

क. ERO Net ईआरओ नेट

ख. Voter Portal मतदार पोर्टल

ग. Voter Helpline App. मतदार मदत उपयोजक.

घ. NVSP एनव्हीएसपी

ङ. NGS Portal एनजीएस पोर्टल

च. SUVIDHA सुविधा

छ. ENCORE एनकोअर

ज. EMS इएमएस

झ. C VIGIL सी व्हीजील (दक्ष नागरिक)

ञ. ETPBS ईटीपीबीएस.

२. निर्णायक व असुरक्षित मतदान केंद्राच्या आंतरजालावरून प्रक्षेपणावरील (वेबकास्टींग) आयोगाच्या अनुदेशांचे अनुपालन करण्यात यावे.

३. आयोगाच्या माहितीसाठी प्रथमस्तरीय तपासणीचा आंतरजालावरून प्रक्षेपण (वेबकास्टींग) करण्यासाठीचा दुवा (लिंक) मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना वेळेवर सामायिक (शेअर) करण्यात यावा.

४. निवडणुकीशी संबंधित विविध कार्यकृतींसाठी, आवश्यकतेनुसार दृक-श्राव्य चित्रण (व्हिडिओग्राफी), सीसीटीव्ही इत्यादींची देखील व्यवस्था करण्यात येईल.

५. माहिती तंत्रज्ञान संबंधित सेवांकरिता कोणत्याही अभिकरणाशी व्यवहार करताना “ **माहिती उघड न करणे करार** ” स्वाक्षरित करण्यात यावा.

६. आयोगाच्या सर्व उपयोजकांचे, पोर्टलचे आणि संकेतस्थळांचे कार्य सुरळीतपणे चालण्यासाठी माहिती तंत्रज्ञानविषयक पायाभूत सुविधा आणि पुरेसे मनुष्यबळ तैनात करण्यात यावे.

## २१.२ काय करू नये.

१. विविध माहिती तंत्रज्ञान उपक्रमशीलतेबाबत लोकांना सजग करण्यासाठी पुढाकार घेण्यास विसरू नका.

२. सर्व उपयोजके/पोर्टल्स चालवण्यासाठी पर्याप्त व सक्षम माहिती तंत्रज्ञानविषयक पायाभूत सुविधांची व्यवस्था करण्यास विसरू नका.

३. अनधिकृत मार्गाने ही उपयोजके हाताळण्यास प्रतिबंध करण्यासाठी अधिक काळजी घेण्यास विसरू नका.

४. प्रचालन अधिकाऱ्यांसाठी वारंवार प्रशिक्षण व्यवस्था करण्याकरिता संकोच करू नका.

५. जिल्हा निवडणूक अधिकारी संकेतस्थळावर सर्व संबद्ध व नवीनतम माहिती नियमितपणे अद्ययावत करण्यास विसरू नका.

# मतमोजणीनंतर

## २२.१ काय करावे

१. ज्याच्या नावाने कोषागारात अनामत रक्कम भरण्यात आली आहे त्याच व्यक्तीला किंवा जर ती मृत पावली असेल तर आणि जर ती पात्रता पूर्ण करत असेल तर, तिच्या कायदेशीर प्रतिनिधीला अनामत रक्कम परत करा.

२. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निदेशपुस्तिकेमधील दिलेल्या प्रपत्रामध्ये अहवालाच्या दोन प्रती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत एक आयोगास, आणि एक प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास देखील पाठवण्यात यावी.

३. मतदानाच्या १५ दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत निर्देशपत्रक (इंडेक्स कार्ड) आयोगास पाठवण्याची सुनिश्चिती करणे.

४. मतदानानंतर एक आठवड्याच्या आत, सर्व छापील, शिल्लक व खराब (वाया गेलेल्या) मतपत्रिका विहित केलेल्या रीतीने नष्ट करण्यात आल्या आहेत, असे प्रमाणित करणारा अहवाल मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास पाठवा.

५. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून मूळ शाईने स्वाक्षरी केलेल्या प्रतीमधील नमुना २०, २१ सी आणि २१ ई मध्ये माहिती घेणे.

६. मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर २४ तासांच्या आत गोपनीय मोहोरा संरक्षणाखाली भारत निवडणूक आयोगास परत करण्याची सुनिश्चिती करा.

७. प्रत्येक मतदारसंघातील उमेदवारांनी सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबांचे अहवाल आणि उशिराने सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबांचे पूरक अहवाल स्वतंत्रपणे भारत निवडणूक आयोगास पाठवा.

८. मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर, सर्व नियंत्रण युनिटांचे ऊर्जा संच (पॉवर पॅक) काढल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (नियंत्रण युनिटे व मतदान युनिटे) आणि व्हीव्हीपीएटीच्या ड्रॉप बॉक्समधून काढलेल्या मुद्रित कागदी चिठ्ठ्या असलेले लिफाफे त्याच सुरक्षित कक्षात ठेवावे आणि रिकामे व्हीव्हीपीएटी स्वतंत्रपणे ठेवावे.

९. सर्व सांविधिक कागदपत्रे गुप्त मोहोरने सीलबंद करावयाचे आहेत मात्र त्याच्या पेटीस कुलूप लावायचे नाही. या पेटीचे कुलूप केवळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या मोहोरेने सीलबंद करण्यात येते.

## २२.२ काय करू नये

१. निर्देशपत्रक (इंडेक्स कार्डच्या) कागदी प्रतीचा एनकोअर (ENCORE) द्वारे निर्मित निर्देशपत्रक (इंडेक्स कार्ड) सोबत पडताळा करण्याचे विसरू नका.

२. उमेदवारांना हस्तांतरित करण्यापूर्वी नमुना २०, २१ सी व २१ ई यांच्या तपासणीची व्यवस्था करण्यास विसरू नका.

३. आयोगाच्या निर्देशानुसार, मतमोजणीनंतर वापरलेल्या ऊर्जा संचाची (पॉवर पॅक) विल्हेवाट लावण्याचे विसरू नका.

४. मतमोजणीनंतर नियंत्रण युनिट सुरक्षित कक्षात ठेवण्यापूर्वी, त्यामध्ये वीजघट (बॅटरीज्) राहू देऊ नका.

५. मतदान आणि मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणूक कालावधी पूर्ण होईपर्यंत, एकापेक्षा अधिक विधानसभा मतदारसंघांची यंत्रे एकाच सुरक्षित कक्षात ठेवू नका.

६. निवडणूक प्रक्रियेचा कालावधी पूर्ण होईपर्यंत सुरक्षित कक्ष उघडू नका. म्हणजेच मा. उच्च न्यायालयाकडून निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीची यादी आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून निर्देश प्राप्त होईपर्यंत.

७. मतमोजणी झाल्यानंतर व्हीव्हीपीएटी भांडारगृहात ठेवण्यापूर्वी सर्व व्हीव्हीपीएटींमधून सर्व व्हीव्हीपीएटीच्या चिठ्ठ्या काढून टाकण्यास विसरू नका.

भारत निवडणूक आयोग